वर्ष १० वें अंक १ ला

१५ ऑगस्ट १९५८

# संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

# दिव्य जीवन

## ग्रंथ–प्रकाशन–योजना

दिव्य जीवन ग्रंथाची छपाई सुरु झाली आहे. संजीवनच्या कांहीं वाचकांनीं विचारल्यावरून ग्रंथांतील विषयांची कल्पना येण्याकरतां पहिल्या खंडाची अनुक्रमणिका देत आहोंत. प्रसिद्धीपूर्वी रु.२५ भरून होणाऱ्या ग्राहकांची नोंद चालू आहे.

## –अनुक्रमणिका–


१ मानवी आकांक्षा
२ दोन नकार – जडवादी नकार
३ दोन नकार – संन्यासी नकार
४ सत्य सर्वव्यापी आहे
५ व्यक्तीची नियति
६ विश्वांत मानवाचें स्थान
७ अहम् आणि द्वंद्वें
८ वेदान्ती ज्ञानाचे मार्ग
९ शुद्ध सद्वस्तु
१० चिन्मय शक्ति
११ अस्तित्वाचा आनंद – प्रश्न
१२ अस्तित्वाचा आनंद – उत्तर
१३ दैवी माया
१४ अतिमानस (विज्ञान) हें सृष्टीची उभारणी करतें.
१५ परात्पर सत्य–संविद्
१६ अतिमानसाच्या तीन अवस्था
१७ दिव्य आत्मा
१८ मानस व अतिमानस
१९ प्राणशक्तिमय जीवन
२० मृत्यु, वासना व असामर्थ्य
२१ जीवनाची ऊर्ध्वगति
२२ जीवनाचा प्रश्न
२३ मानवांतील दोन आत्मे
२४ जडतत्त्व
२५ जडाची ग्रंथि
२६ चढती तत्त्वमालिका
२७ अस्तित्वाच्या सात तारा
२८ अतिमानस, मानस आणि अधिमानसी माया



## संजीवन कार्यालय

**श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी**

वर्ष १० अंक १ला      १५ ऑगस्ट १९५८

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक

संपादकः

भालचंद्र लिमये

**संजीवन कार्यालय**

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

# १५ ऑगस्ट १९५८

श्रीमाताजींचा श्वेत प्रकाश हा भागवत चेतनेचा प्रकाश आहे; तुम्ही त्यामध्यें अधिकाधिक जगत आहांत आणि तोच तुम्हांला मुक्त करीत आहे.

२५-८-१९३४ —श्रीअरविंद

Sri Aurobindo Darshan Messages : 15.08.1958

वार्षिक वर्गणी—यथाशक्ति.

संपादक—भालचंद्र लिमये.

प्रकाशक—'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.

मुद्रक—श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.

583/58/7/800




Sri Aurobindo
*(Pondicherry : 1916)*

श्रीमाताजींनीं संजीवनसाठीं दिलेला संदेश.

15-8-48 — 15.8.58

Let the Sanjivan be like a flaming torch throwing the eternal Light on all those who read it.

With blessings

१५-८-१९४८ — १५-८-१९५८

संजीवन हें त्याच्या सर्व वाचकांना सनातन प्रकाश देणाऱ्या ज्वलंत प्रदीपाप्रमाणें होवो.

आशीर्वाद

—श्रीमाताजी


# अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी | ५ |
| २ 'शाश्वत जन्म' | श्रीमाताजी | ७ |
| ३ मातृवाणी | श्रीमाताजी | ८ |
| ४ आपली पृथ्वी | श्रीमाताजी | १० |
| ५ त्रिविध जीवन | श्रीअरविंद | ११ |
| ६ अनातोल फ्रांसचे देवावरील आक्षेप | श्रीअरविंद | १६ |
| ७ सत्यनिष्ठा (विद्यार्थ्यांसाठीं) | श्रीमाताजी | १८ |
| ८ वाचकांचे प्रश्न | रेवान् | २३ |
| ९ व्यक्तीचें खरें मूल्य | श्रीमाताजी | २६ |
| १० दिव्य जीवन | श्रीअरविंद | २७ |
| ११ श्रीमाताजींचीं प्रवचनें | श्रीमाताजी | ३२ |
| १ श्रीअरविंदांचें कार्य | | ३२ |
| २ प्रथमदर्शनीं आकर्षण | | ३२ |
| १२ 'यू नो' व 'जागतिक राज्य,' निर्मिति | श्रीअरविंद | ३५ |
| १३ साधकांना पत्रें | श्रीअरविंद | ३८ |
| १४ श्रीअरविंदांचें वाङ्मय | मा. पुं. पंडित | ४१ |
| १५ अडचणींमध्यें असतांना | श्रीअरविंद | ४४ |
| १६ साहित्य सत्कार | | ४५ |

वर्ष १० अंक १ ला

१५ ऑगस्ट १९५८

# संजीवन



तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,
देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलोः

ऋग्वेद–१. ५०. १०

---

## प्रार्थना आणि ध्यान

१४ फेब्रुवारी १९१४

शांति, अखिल धरणीवर शांति !

सर्व लोक जाणिवेच्या सामान्य अवस्थेंतून सुटून, सांसारिक वस्तूंच्या आसक्तींतून मुक्त होऊन, त्यांना तुझ्या दिव्य अस्तित्वाचें ज्ञान होऊं दे. तुझ्या सर्वोच्च जाणिवेशीं त्यांचें तादात्म्य होऊं दे आणि त्यामधून निर्झरणाऱ्या विपुल शांतीचा त्यांना आस्वाद घेतां येऊं दे.

प्रभो, तूं आमच्या अस्तित्वाचा सार्वभौम स्वामी आहेस. तुझा दिव्य दंडक हा आमच्या जीवनाचा नियंता आहे. आमच्या सर्व सामर्थ्यानिशीं आम्ही अशी तीव्र आकांक्षा धरतो कीं, तुझ्या शाश्वत चेतनेशीं आमच्या चेतनेचें, जाणिवेचें तादात्म्य व्हावें, म्हणजे क्षणोक्षणीं आणि प्रत्येक क्रियेमध्यें तुझेंच महान् कार्य आम्ही संपादन करूं शकूं.

हे नाथ, आम्हाला भावी आपत्तींच्या काळजीपासून मुक्त कर. घटनांकडे, वस्तूंकडे, स्थूल सामान्य दृष्टीनें पहाण्याच्या संवयीपासून आमची सोडवणुक कर. असें वरदान दे कीं, ज्यामुळें आम्ही यापुढें केवळ तुझ्याच दृष्टीनें पाहूं आणि तुझ्याच इच्छेनें कार्य करूं. तुझ्या दिव्य प्रेमाचे जितेजागते प्रदीप तूं आम्हाला बनव.

आदरानें, भक्तिभावानें, माझ्या अखिल अस्तित्वाचें सानंद समर्पण करून, हे प्रभो, तुझेंच कार्य सफल करण्यासाठीं मी स्वतःस तुझ्या चरणीं सर्मपित करत आहे.

शांति, अखिल पृथ्वीवर शांति !



*

१५ फेब्रुवारी १९१४

हे देवा, एकमात्र सत्यरूपा, तूं आमच्या प्रकाशाचाहि प्रकाश आहेस आणि जीवनाचेंहि जीवन आहेस. हे परम प्रेममया, जगदोद्धारका, तुझ्या निरंतर सान्निध्याच्या जाणीवेविषयीं मी अधिकाधिक संपूर्णतया जागृत होत जावें असा मला वर दे. तुझ्याच दंडकानुसार माझीं सारीं कर्में घडूं देत. माझी इच्छा आणि तुझी इच्छा यांमध्यें मुळींच भेद राहूं नये, माझ्या मनाच्या भ्रमरूप जाणीवेपासून व मनाच्या आभासमय, काल्पनिक जगतापासून मला दूर ठेव. माझी जाणीव पूर्ण चेतनेशीं तादात्म्य पावूं दे; कारण ती परम चेतना म्हणजे तूंच आहेस.

ध्येयप्राप्तीच्या संकल्पामध्यें मला स्थिरता, दृढता प्रदान कर. सारी जडता, ग्लानी आणि शिथिलता यांना पराभूत करणारें धैर्य-वीर्य आणि दृढता व शक्ति मला प्रदान कर.

परिपूर्ण अनासक्तीची शांति, तुझें सान्निध्य अनुभवास आणून देणारी आणि तुझी मध्यस्थी फलदायी करणारी शांति, प्रत्येक दुष्ट इच्छा आणि सारी अंधःकारमय दुर्बोधता यांच्यावर सदा विजयी होणारी शांति मला दे.

हे प्रभो, माझें सारें अस्तित्व तुझ्याशीं एकरूप होऊन जाऊं दे; आणि तुझ्या प्रेमपूर्ण उच्चतम कार्यान्विषयीं संपूर्ण जागृत होऊन मी तुझ्याच प्रेमाची एक धगधगती ज्वाला होऊन जाऊं दे, असें मी तुझ्या पायाशीं प्रार्थीत आहे. CWMCE Vol 01 : Page 75

★

१६ फेब्रुवारी १९१४

हे परमेश्वरा, एकमेव सत्ताधीशा, सत्य-चैतन्यमया, अखंड एकरूपा, पूर्ण प्रकाशधामा, तुझ्याशिवाय अन्य कशाचीहि जाणीव मला नको, माझें अखिल अस्तित्वच तुझ्या अस्तित्वानें भरून जाऊं दे, अशी किती तीव्रतेनें मी अभीप्सा करीत आहे, आंस धरीत आहे !

व्यक्तित्वाचें हें अविश्रांत भ्रमण, हें नानात्व, ही जटिलता, संघर्षमय विचारांचा हा न संपणारा अतिरिक्त गोंधळ, विरोधी प्रवृत्तींचा कोलाहल आणि संघर्षमय वासनांचा धिंगाणा मला दिवसानुदिवस क्लेशकारक वाटूं लागला आहे. या प्रचंड, खवळलेल्या समुद्रांतून बाहेर पडून तुझ्या प्रशांत, स्थिर किनाऱ्यावर आम्हीं उतरलें पाहिजे. कधींहि न थकणाऱ्या जल-तरणपटूची शक्ति व दमदारपणा ह्यांची मला गरज आहे. हे प्रभो, कितीहि परिश्रम करावे लागले तरी चालतील, मला तुझी प्राप्ति करून घ्यावयाची आहे. ....प्रभो, अज्ञानावर विजय मिळविला पाहिजे, भ्रम दूर झाला पाहिजे, हें दुःखमय जग त्याच्या भयानक, दुष्ट स्वप्नांतून बाहेर आलें पाहिजे. हें भीषण स्वप्न समाप्त होऊन तुझ्या एकमात्र अस्तित्वाची जाणीव त्याला झाली पाहिजे.

हे अचल शांतिरूपा, मानवाची अज्ञानांतून सुटका कर, तुझा पूर्ण आणि शुद्ध प्रकाश सर्वत्र पसरूं दे. त्याचेंच पृथ्वीवर अधिराज्य होऊं दे.

—श्रीमाताजी

CWMCE Vol 01 : Page 76

# 'शाश्वत जन्म'

'श्रीअरविंदांचा जन्म एक 'शाश्वत जन्म' आहे,' म्हणजे काय ?

. . . 'शाश्वत जन्म' याचा शाब्दिक अर्थ घ्यावयाचा म्हटलें तर त्यास फारसा अर्थ नाहीं. पण त्यांत एक भौतिक अर्थ, मानसिक अर्थ, आंतरिक अर्थ आणि आध्यात्मिक अर्थ कसा आहे तें मी आतां तुम्हांला सांगणार आहे.

भौतिक दृष्टीनें पहातां याचा अर्थ असा कीं, पृथ्वीच्या अंतापर्यंत श्रीअरविंदांच्या जन्माचे परिणाम कायम रहातील. म्हणजेच त्यांच्या जन्माचे परिणाम अनंत काळपर्यंत अनुभवास येत रहातील. म्हणून आलंकारिक भाषेंत मी या जन्मास 'शाश्वत' असें म्हटलें आहे.

मानसिक दृष्टीनें श्रीअरविंदांच्या जन्माची स्मृति सदैव राहील. श्रीअरविंदांचा जन्म आणि त्याचे झालेले परिणाम युगानुयुगें लोक आठवत रहातील.

याचा आंतरिक अर्थ असा सांगतां येईल कीं, अशा तऱ्हेच्या जन्माची निरंतर पुनरावृत्ति होईल. विश्वाच्या इतिहासामध्यें एका युगामधून दुसऱ्या युगांत जातांना अशा तऱ्हेचा जन्म पुनःपुनः होत राहील. अशा तऱ्हेचा आविष्कार मधून मधून ठराविक कालखंडानंतर होत असतो; म्हणजेच, अशा तऱ्हेच्या जन्माची पुनरावृत्ति होत असते आणि प्रत्येक वेळीं आपणा-बरोबर हा जन्म कांहीं तरी अधिक, अधिक पूर्णता, अधिक सर्वांगीणता घेऊन येत असतो. या प्रत्येक वेळीं पार्थिव शरीरांत झालेली ती एक अवतरणाची, आविष्काराची क्रिया असते, तें पार्थिव देह-धारण असतें.

शेवटीं, केवळ शुद्ध आध्यात्मिक दृष्टिकोणांतून पाहिलें असतां, आपण असें म्हणूं शकूं कीं, हा जन्म म्हणजे प्रत्यक्ष सनातन 'शाश्वतानें' पृथ्वीवर घेतलेला जन्म होय. कारण ज्या ज्या वेळीं भौतिक शरीरांत अवतार येतो त्या त्या वेळीं प्रत्यक्ष शाश्वत तत्त्वाचाच, अनंताचाच पृथ्वीवर जन्म होत असतो.

'शाश्वत जन्म' या दोन शब्दांमध्यें हा सर्व अर्थ अभिप्रेत आहे. . . . . .

—श्रीमाताजी

CWMCE Vol 09 : Page 178

# मातृवाणी

**आम्हांला योगासंबंधीं कांहीं सांगाल काय ?**

योग तुम्हांला कशासाठीं हवा आहे ? सामर्थ्य लाभावें म्हणून ? मनःशांति, मनःस्थिरता प्राप्त व्हावी म्हणून ? कां मानवतेची सेवा करावयाची आहे म्हणून ?

तुम्ही योगमार्ग स्वीकारण्यास पात्र आहांत हें दाखवून देण्यास यांपैकीं कोणतेंहि उद्दिष्ट पुरेसें नाहीं.

त्याकरतां तुम्हांला या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं पाहिजेत कीं, भगवंताकरितां तुम्हांला योग करावासा वाटतो काय ? भगवंत हाच तुमच्या जीविताचें परमोच्च सत्य आहे काय ? भगवंतावांचून जगणेंच अगदीं अशक्य, अशी वस्तुथिति आहे काय ? तुम्हांला असें वाटतें काय कीं, भगवंत हेंच तुमच्या अस्तित्वाचें एकमेव कारण आहे आणि भगवंताविना तुमच्या जीवनास कांहींच अर्थ नाहीं ? असें असेल तरच तुम्हांला योग-मार्ग स्वीकारण्याविषयीं आंतरिक हांक आली आहे असें म्हणतां येईल.

पहिली आवश्यक गोष्ट हीच आहे—भगवंतासाठीं तळमळ,—अभीप्सा.

नंतर या अभीप्सेचें संगोपन करावयाचें, ती सतत जागृत, सावध व जिवंत राखावयाची. त्याकरतां एकाग्रता लागते; भगवत् संकल्प व भगवंताचें उद्दिष्ट यांसाठीं सर्वांगांनीं व निरपेक्षपणें स्वतःस वाहून घेतां यावें या हेतूनें भगवंताचे ठिकाणीं एकाग्रता करावयास पाहिजे.

स्वतःचें हृदयाच्या ठिकाणीं एकाग्रता करा. आंत प्रवेश करा, शक्य तितकें आंत खोल खोल अगदीं दूर जा. तुमच्या बहिर्मुख जाणीवेचे पसरलेले सारे धागे एकत्रित करून ते सारे बरोबर घेऊन आंत बुडी मारा आणि खोल खोल जा.

तिथें, हृदयाच्या त्या निवांत प्रशांत गाभाऱ्यांत एक अग्नि तेवत आहे. तेंच तुमच्या अंतरीचें देवत्व—तुमचें खरेखुरें अस्तित्व. त्याचा आदेश ऐका, त्याच्या आज्ञेचें अनुसरण करा.

एकाग्रता करण्याचीं आणखीं दुसरींहि केंद्रें आहेत—एक मस्तकाचे वर, दुसरें एक भुंवयांचें मध्यभागीं. प्रत्येक केंद्राची स्वतंत्र अशी उपयुक्तता असते आणि त्याचें विशिष्ट परिणामहि वेगळे असतात. पण अस्तित्वाचें केंद्र-स्थान हृदय हें आहे. सर्व प्रमुख प्रवृत्ती हृदयामध्येंच उत्पन्न होतात.—परिवर्तनास लागणारी कर्मप्रेरणा व उत्कटता आणि साक्षात्कार करून घेण्याची शक्ति ह्या दोन्हीं तेथूनच निर्माण होतात.

*

**योग करण्याची पात्रता येण्यासाठीं आम्ही काय केलें पाहिजे ?**

प्रथम जागृत झालें पाहिजे. आपल्या अस्तित्वाच्या अगदींच अल्प अंशाची आपल्याला जाणीव असते. उरलेला बहुतेक सर्व भाग आपल्याला अज्ञात असतो. आपण त्याविषयीं

अजागृत असतो. या अजागृतीमुळेंच आपण आपल्या असंस्कारित स्वभावाला चिकटून रहातो आणि आपल्या स्वभावांत कांहीं बदल किंवा परिवर्तन घडून येण्यास तिचा प्रतिबंध होतो. या अजागृतीद्वारेंच अदिव्य शक्ती आपणांमध्यें प्रवेश करतात आणि आपल्याला त्यांचें गुलाम करून टाकतात. तुम्हीं स्वतःविषयीं जागृत झालें पाहिजे, तुमचा स्वभाव व क्रिया यांविषयीं तुम्ही जाणीव करून घेतली पाहिजे. तुम्हीं कांहीं गोष्टी कां करतां व कशा करतां, त्या-विषयीं तुमच्या भावना कशा प्रकारच्या व तशा कां आहेत, त्या गोष्टीसंबंधीं तुमचे विचार काय आहेत व ते तसे कां आहेत ह्याचें ज्ञान तुम्हीं करून घेतलें पाहिजे. जे हेतु व ज्या उर्मी, ज्या प्रकट वा अप्रकट शक्ती तुम्हांला कार्यप्रवृत्त करतात त्या तुम्हीं समजून घेतल्या पाहिजेत. सारांश, तुम्ही आपल्या अस्तित्वरूपी यंत्राचे जणुं भाग न् भाग सुटे सुटे करून निरखून पारखून पाहिले पाहिजेत. अशारीतीनें तुम्ही एकदां जागृत झालांत कीं, तुम्हांला वस्तुस्थिति ओळखतां येईल, तिचें पृथक्करण करतां येईल. कोणत्या शक्ती तुम्हांला खालीं खेंचणाऱ्या आहेत आणि प्रगति करण्यास कोणत्या शक्ती साह्यभूत आहेत हें तुम्हांला ओळ-खतां येईल. योग्य कोणतें नि अयोग्य कोणतें, सत्य कोणतें नि असत्य कोणतें, दिव्य कोणतें नि अदिव्य कोणतें हें एकदां समजूं लागलें कीं जें योग्य, सत्य, दिव्य असेल त्याला धरूनच अगदीं कांटेकोरपणें आचरण केलें पाहिजे, म्हणजेच जें योग्य, दिव्य त्याचा निश्चयपूर्वक स्वीकार करून तद्विरोधी सर्वांचा त्याग केला पाहिजे. पदोपदीं हें द्वंद्व तुमच्यापुढें उभें राहील आणि पदोपदीं इष्ट ती निवड तुम्हांस करावी लागेल. तुम्हांला धीर धरावा लागेल, चिकाटीनें व सावधगिरीनें प्रयत्न करावा लागेल, जणुं डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवावें लागेल. दिव्य शक्तीच्या विरुद्ध अदिव्य शक्तीस कसलीच संधि कधींहि मिळूं द्यावयाची नाहीं असें वागावें लागेल.

★

**ह्या योगाचें उद्दिष्ट मानवजातीचें कल्याण साधणें हें आहे का ?**

नाहीं. हा योग भगवंतासाठीं आहे. मानवतेचें कल्याण हें या योगाचें उद्दिष्ट नसून भगवन्ताचा आविष्कार हा या योगाचा हेतु आहे. भगवत्संकल्पाची परिपूर्ति करण्याकरतां आपण येथें आहोंत. किंबहुना असें म्हणणें सयुक्तिक होईल कीं, परमेश्वराला उत्तरोत्तर अधिकाधिक मूर्तिमान् करून त्याची सत्ता या पृथ्वीवर प्रस्थापित करण्याच्या महान् कार्यांत आम्हीं साधन व्हावें म्हणून भगवत्संकल्पानें आमच्या ठिकाणीं कार्य करावें यासाठीं आपण आहोंत. मानवजातीपैकीं जे कोणी भगवन्ताच्या हांकेस 'ओ' देतील त्यांना भगवत्कृपा प्राप्त होईल.

या कार्यानें मानवजातीला प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्षपणें लाभ होणें वा न होणें हें सर्वस्वीं मानवजातीच्याच तयारीवर अवलंबून राहील. मानवजातीच्या सद्यःस्थितीवरून अनुमान केलें तर, या बाबतीत फारशी आशा दिसत नाहीं. सर्वसामान्य मनुष्याची, म्हणजेच मानव-जातीचें प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीची आज वृत्ति काय आहे ? खरें खुरें दिव्यत्व असलेल्या कोणत्याहि गोष्टीशीं संबंध येतांच संतप्त होऊन त्याविरुद्ध तो बंड करून उठत नाहीं काय ? भगवंताचा स्वीकार करणें म्हणजे अत्यंत प्रिय म्हणून हृदयाशीं बाळगलेल्या सर्व गोष्टींचा

नाश करणें आहे, असें नाहीं कां त्याला वाटत ? जी जी भगवन्ताची योजना व भगवन्ताचा संकल्प असेल त्या साऱ्यास संतप्त स्वरानें स्वच्छ नकार देण्याचें काम तो सारखा करीत राहिलेला नाहीं काय ? भगवंताच्या अवतरणामुळें कांहीं लाभ व्हावा अशी आशा धरण्यापूर्वी सांप्रतच्या मानवजातीमध्यें पुष्कळच बदल घडून आला पाहिजे.

*

**आपण सर्व या ठिकाणीं एकत्र आलों आहोंत, हें कसें ?**

गत जन्मींहि आपण सर्व एकत्र आलों होतो. तसें नसतें तर या जन्मीं आपण एकत्र आलोंच नसतो. आपण सारे एकाच परिवारांतील आहोंत; आणि परमेश्वराच्या कार्याचा विजय व्हावा व परमेश्वर पृथ्वीवर प्रकट व्हावा म्हणून युगानुयुगें आपण प्रयत्न करीत आलों आहोंत.

—श्रीमाताजी

CWMCE Vol 03 : Page 01

# आपली पृथ्वी

आपली पृथ्वी हा अखिल विश्वचक्राचा जणुं केंद्रबिंदु आहे. जडतत्त्वास दिव्यता देणाऱ्या महाशक्तीस केंद्रीभूत होण्यासाठीं भू-गोल ही आधार-भूमि निर्मिलेली आहे. जडतत्त्वाच्या गर्भीं दिव्यतेप्रत जाण्याची क्षमता सुप्तरूपानें अस्तित्वांत आहे हें दाखविण्याचें प्रतीक म्हणजे भू-गोल, असें म्हणतां येईल. आपण पूर्वी पाहिलेंच आहे कीं, दिव्य-शक्तीच्या प्रत्यक्ष मध्यस्थीनें या भू-गोलाची निर्मिति झाली आहे. या भू-गोलावरच केवळ भगवन्ताशीं संयोग घडून येऊं शकतो. भगवन्ताशीं हा भू-गोल, ही पृथ्वी प्रत्यक्षतः संयुक्त झालेली आहे. ही पृथ्वी दिव्य प्रकाश स्वीकारते, स्वतःच्या अंतरंगीं मुरविते, वाढविते आणि भोंवतालच्या अवकाशांत त्याची प्रभा फांकविते. जेथपर्यंत जडद्रव्याचा अंश आहे तेथपर्यंत हा दिव्य प्रकाश पोहोंचविण्याचें कार्य ही पृथ्वी करीत असते. जडविश्व, या प्रकाशाचा स्वीकार कांहीं प्रमाणांत करीत असतें, दिव्य चेतनेचा प्रकाश व सुसंवाद यांचा अंशतः स्वीकार तें करतें. तरीपण या दिव्य प्रकाशाचें व सुसंवादाचें पूर्ण विकसित सर्वांगीण दर्शन एकट्या या पृथ्वीवरच शक्य आहे.

आंतरात्म्याची वस्तीहि केवळ पृथ्वीवरच आढळते. कारण पृथ्वी हीच तर आंतरात्म्याची जननी आहे. जडद्रव्यास भगवंताचा स्पर्श म्हणजेच आंतरात्म्याचा जन्म. आंतरात्मा म्हणजे जणुं पृथ्वीचें बालकच. पृथ्वीवरच तें जन्मतें, वाढतें. दुसऱ्या कोठेंहि त्याचा जन्म अशक्य आहे. तरीपण त्याची पूर्ण वाढ झाली, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास झाला म्हणजे तो इतरत्रहि संचरूं लागतो; इतरहि ग्रहांना भेटी देऊं शकतो. या सर्वांस कारण व आधार ही पृथ्वीच आहे.

—श्रीमाताजी

# योग समन्वय

( फेब्रुवारी अंकावरून पुढें )

## प्रस्तावना

३

### त्रिविध जीवन

प्रकृति म्हणजे अशाप्रकारें एक उत्क्रांति अथवा एका सनातन व गुह्य तत्त्वाचें प्रगमनशील आंत्मप्रकटीकरण असून क्रमाक्रमानें तीन रूपांनीं तिनें आपल्या चढाईचीं तीन पावलें टाकलीं आहेत; आणि त्यामुळें शारीरिक जीवन, मानसिक अस्तित्व व तिसरें म्हणजे सृष्टिक्रमाच्या अवरोहणामध्यें सर्वांचें मूळ असणारें व आरोहणांत फलस्वरूप घेणारे आध्यात्मिक सुप्त चैतन्य ह्या तीन अन्योन्याश्रयी शक्यतांनीं आपल्या सर्व क्रिया परिसीमित केल्या आहेत, हें आपण पाहिलें. शरीराचें संगोपन व संपूर्ण संवर्धन करावें, मनस्तत्त्वाचा पूर्ण विकास साधावा व त्या परिपूर्ण शरीर-मनांत आत्मतत्त्वाच्या सर्वातीत क्रियांचा आविष्कार करावा हें प्रकृतीचें उद्दिष्ट आहे, व आपलेंहि तेंच लक्ष्य असलें पाहिजे. ज्याप्रमाणें शारीरजीवन नष्ट न करतां उलट त्याची उपयुक्तता व उंची वाढावी अशारीतीनें मानसिक जीवन हें कार्य करतें, त्याच प्रमाणें आध्यात्मिक जीवनक्रमानें आपल्या बौद्धिक, भावनात्मक, सौंदर्यविषयक व प्राणाधिष्ठित सर्व क्रियांचा लोप न करतां उलट त्यांचें रूपांतरच केलें पाहिजे.

पार्थिव प्रकृतीचा अग्रणी, पूर्ण उत्क्रांतीची शक्यता असणारा एकमेव पार्थिव आकार, असा जो मानव तो स्वभावतःच त्रिजन्मा आहे. त्याला एका जित्याजागत्या चौकटीचें दान मिळालें असून शरीर हें त्यांतील एक पात्र आहे; प्राण हें त्यांतील भागवत आविष्काराचें चैतन्यशाली साधन आहे. प्रगतशील मनामध्यें याच्या सर्व क्रिया केंद्रित झाल्या आहेत. ह्या मनाचें ध्येय, आपल्या स्वतःचे, त्याचप्रमाणें ज्या देह-सदनांत आपण राहतो त्याचें व जें प्राणरूपी साधन आपण वापरतो त्याचें पूर्णत्व साधावें हें असून, सतत वाढत जाणाऱ्या आत्म-साक्षात्काराच्या द्वारां जागृत होऊन स्वतःच्या मूळ स्वरूपाप्रत, म्हणजेच आत्म्याचा एक आकार या स्वरूपाप्रत पोहोंचण्याची पात्रताहि त्या मनामध्यें आहे. अशा प्रकारचा मानव हा अखे-रीस आपल्या मूळपदीं विराजमान होतो. सध्यां सुप्त असणाऱ्या आपल्या परमवैभवानें मन व प्राण तेजोमय करणारें प्रकाशमय व आनंदमय आत्मतत्त्व हें त्याचें मूळ स्वरूप आहे, त्याप्रत तो पोहोंचतो.

मानवामध्यें वसणाऱ्या भागवत शक्तीचीहि अशा प्रकारची योजना असल्यानें आपल्यांतील या तीन मूलभूत घटकांच्या परस्पर क्रियाप्रतिक्रियांच्या द्वारेंच आपल्या अखिल अस्तित्वाचें ध्येय व कार्यपद्धति ठरणार हें निश्चित. तीन तत्त्वांच्या प्रकृतीमधील पृथक् घडणींतून

मनुष्यापुढें त्रिविध जीवनाची शक्यता उभी राहते. सामान्य भौतिक अस्तित्व, मानसिक-क्रिया-प्रधान मानसिक प्रगतिमय जीवन आणि आध्यात्मिक परिवर्तनीय दिव्यानंदमय जीवन. परंतु, मनुष्य हा स्वतःची प्रगति करतां करतां ह्या त्रिविध जीवनांचा संगम साधूं शकतो; त्यांच्यांतील विसंगति नाहींशी करून त्यांचें एका सुसंवादित तालबद्धतेंत रूपांतर करूं शकतो व आपल्यामध्यें संपूर्ण देवत्व, पूर्ण–नैंर उत्पन्न करूं शकतो.

प्रकृतीच्या सर्वसामान्य व्यवहारांत ह्या तीन तत्त्वांचीं स्वतःचीं वैशिष्टचें व स्वतंत्र नियामक भाव असतात.

शारीरिक जीवनाची विशिष्ट शक्ति ही, प्रकृतीमध्यें तितकीशी 'टिकून राहण्यामध्यें' नसून स्थितिस्थापकतेमध्यें असते. व्यक्तिगत आत्मविकासांत नसून स्व-पुनरावृत्तींत असते. भौतिक प्रकृतींत खरोखर एका प्रकारांतून दुसऱ्या प्रकारांत, वनस्पतींतून प्राणिमात्रांत, प्राणिमात्रांतून मानवरूपांत प्रगति होत असलेली आपण पाहतो. कारण निर्जीव जड तत्त्वांतहि मनस्तत्व काम करीत असतें. परंतु एकदां एका प्रकाराच्या कोटीचें वैशिष्टच स्थापन झालें कीं मग मात्र लगेच पृथ्वीमाता सतत पुनर्निर्मिती करून, तो प्रकार, ती कोटी कायम ठेवण्यांत मुख्यतः गढून जाते. प्राणतत्त्व हें नेहमीं अमर होण्याच्या प्रयत्नांत असतें. परंतु कोणताहि व्यक्तिगत आकार अशाश्वत असून विश्वोत्पत्ति करणाऱ्या जाणिवेंत त्या आकाराची असलेली कल्पना हीच मात्र अमर असल्यानें––कारण तेथें ती कधींच नाश पावत नाहीं––त्या आकारांचें सतत पुनरुत्पादन करीत राहणें हाच एक पार्थिव अमरत्व प्राप्त करून घेण्याचा मार्ग शक्य असतो. स्व-संरक्षण, स्व-पुनरावृत्ति व स्व-बहुलीकरण हें अशाप्रकारें ओघानेंच भौतिक अस्तित्वाचें प्रमुख नैसर्गिक भाव ठरतात.

शुद्ध मनस्तत्वाची विशिष्ट शक्ति म्हणजे बदल. त्या मनाची उंची व संसार यांचा घटितपणा जसजसा वाढतो, तसतसे मनाच्या या धर्माला सातत्यपूर्ण विकसनाचें, उत्कर्षाचें व आपल्या मिळकतीच्या सर्वोत्तम व्यवस्थेचें स्वरूप येतें; व त्यांतूनच संकुचित आणि सर्वसामान्य दशेंतून विशालतर व सर्वंकष पूर्णत्वाकडे जाण्याचा चिरमार्ग प्रकट होतो. मन हें शारीरिक जीवनासारखें संकुचित नसून उलटपक्षीं त्याचें क्षेत्र अमर्याद आहे. विशाल होत जाण्याकरतां आवश्यक असलेला लवचिकपणा त्यामध्यें आहे व आपली घडण तें लीलया पालटूं शकतें. एका रीतीनें बदल, स्व-विकसन आणि स्वोत्कर्ष हे त्याचे स्वाभाविक सहजधर्म आहेत. पूर्णत्व त्याचा श्रद्धाबिंदु असून प्रगति ही त्याची ललकारी, ध्येयमंत्र आहे.

आत्मचैतन्याचा स्वभावधर्म म्हणजे स्वयंभू पूर्णत्व व अविकार्य अनंतत्व. प्राणतत्त्वाचें लक्ष्य असणारें जें अमरत्व व मनस्तत्वाचें ध्येय असणारें जें पूर्णत्व हीं दोन्हीं त्याच्याठायीं नेहमींच वसत असतात. ही त्याची अंगभूत संपदा असते. सनातन सत्याची प्राप्ति करून घेणें आणि सर्व वस्तुमात्रांत व त्यापलीकडे नित्य वास करणाऱ्या, विश्वान्तर्गत व विश्वातीत या दोन्ही रूपांत समान आल्हादमयी असणाऱ्या, रूप व कार्य ह्यांमध्यें राहूनहि त्यांचें अपूर्णत्व व मर्यादा यांचा स्पर्शहि न होणाऱ्या तत्त्वाचा साक्षात्कार घडविणें हें आध्यात्मिक जीवनाचें अंगभूत वैभव आहे.

ह्या प्रत्येक प्रकारामध्यें, शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक जीवन–प्रकारांमध्यें, व्यष्टि व समष्टि या दोन्ही रूपांत प्रकृति काम करत असते. कारण सनातन तत्त्व ज्याप्रमाणें

व्यक्तींत असतें तसेंच तें कुटुंब, जाति, राष्ट्र, अथवा तितकेंसें भौतिक तत्त्वांवर अवलंबून नसणारे इतर समूह वा सर्वोच्च समूह म्हणजे जी अखिल मानवता या सर्वांमध्येंहि सारख्याच प्रमाणांत स्वतःचें अस्तित्व सिद्ध करीत असतें. मानव स्वतः आपलें व्यक्तिगत कल्याण ह्यांपैकीं कोणत्याहि एका अथवा अनेक कार्यक्षेत्रांत शोधूं शकेल, अथवा त्यांच्यांतील सामूहिक जीवनाशीं एकरूप होऊन त्याकरतांहि जीवन जगूं शकेल; किंवा ह्या विश्व-गुंफणीचें यथोचित आकलन करून घेऊन एका श्रेष्ठ भूमिकेवरून व्यक्तिगत साक्षात्काराचा समष्टि-ध्येयाशीं सुसंवाद साधूं शकेल. कारण ज्याप्रमाणें या जगतामध्यें असतांना आत्म्याचा परमात्म्याशीं तोच संबंध योग्य ठरतो कीं ज्यावेळीं, आत्मा अहंकारी आग्रहानें केवळ आपल्या स्वतःचें वेगळें असें अस्तित्व मानत नाहीं किंवा त्या बरोबर केवल अनिर्वचनीय ब्रह्मामध्यें स्वतःस पुसूनहि टाकत नाहीं, तर भगवंताशीं व जगाशीं असणाऱ्या आपल्या एकत्वाचा साक्षात्कार करून घेऊन व्यष्टीमध्यें त्या एकत्वाची स्थापना करतो. त्याचप्रमाणें व्यष्टीचा समष्टीशीं असणारा तोच संबंध योग्य ठरतो कीं ज्यावेळीं, व्यक्ति अन्य व्यक्तींची उपेक्षा करून अहंकारानें केवळ आपलीच भौतिक वा मानसिक प्रगति अथवा आध्यात्मिक मुक्ति यांच्या मागें लागत नाहीं अथवा त्याचबरोबर समष्टीसाठीं स्वतःची योग्य वाढ दाबून वा खुरटवूनहि टाकीत नाहीं, उलट सर्वोच्च व्यक्तींचा साक्षात्कार अखिल मानवजातीला प्राप्त होण्याच्या मार्गावर मानवजात पुढें जावी म्हणून समाजाच्या सर्व अत्युत्तम व पूर्ण शक्यतांचा स्वतःमध्यें समग्रात्मक साक्षात्कार करून आपले विचार, कृति व इतर साधनें यांनीं सभोंवतालच्या वातावरणावर त्या अनुभवांचा वर्षाव करते.

वरील विवेचनावरून हें उघड होतें कीं भौतिक जीवनाचा सर्वांत श्रेष्ठ उद्देश, प्रकृतीचें प्राणतत्त्वविषयक ध्येय परिपूर्ण करणें, हाच असला पाहिजे. आधिभौतिक मानवाचा एकमेव उद्देश म्हणजे जगणें; जन्मापासून मृत्यूपर्यंत जेवढ्या चैनींत व मजेंत काळ कंठतां येईल तसा कंठणें. पण कांहीं ना कांहीं करून जगणें, हा उद्देश तो कनिष्ठ लेखूं शकतो. परंतु तेंहि भौतिक प्रकृतीच्या इतर सहज प्रेरणांसाठींच—प्रजोत्पादनासाठीं, आपलें कुटुंब, जाति वा समाज यांची परंपरा रहावी ह्यासाठीं. स्व, कौटुंबिकता, समाजाची व राष्ट्राची परंपरागत धारणा हे भौतिक जीवनाचे मूल घटक आहेत. प्रकृतीच्या व्यापारामध्यें असणारें त्याचे थोर महत्त्व स्वयंस्पष्ट आहे व त्याचप्रमाणांत त्याचें प्रतिनिधित्व करणाऱ्या मनुष्यवंशाचेंहि महत्त्व आहे. कारण प्रकृतीनें उत्पन्न केलेल्या मानवी चौकटीच्या सुरक्षिततत्त्वाची व तिनें निर्माण केलेल्या मानवपूर्व संपत्तीचें सातत्य व संगोपन यांची मनुष्य त्या प्रकारें ग्वाही देत असतो.

परंतु अशीं माणसें व त्यांचें जीवन यावर वरील उपयुक्ततेमुळेंच मर्यादितपणाचा, अविचारी प्रतिगामित्वाचा व पार्थिव बंधनप्रियतेचा दोषारोप येतो. परंपरागत रहाटी, रूढ समाजरचना व वंशपरंपरेनें आणि संवयीनें चालत आलेली विचारप्रणाली या गोष्टी भौतिक मनुष्याला श्वासोच्छ्वासाप्रमाणें असतात. प्रागतिक लोकांनीं पूर्वी केलेल्या सुधारणा ते मान्य करतात व त्यांचें आग्रहानें संरक्षण करतात. परंतु तेंच प्रागतिक मन वर्तमानकाळीं ज्या सुधारणा करीत असेल त्यांना तेवढ्याच हिरीरीनें हे लोक विरोध करतात. कारण भौतिक जडवादी मनुष्याच्या दृष्टीनें वर्तमानकालीन प्रागतिक विचार करणारा मनुष्य हा नेहमींच आदर्शवादी, स्वप्नाळु व वेडसर असतो. आपल्या द्रष्ट्या पुरुषांना जिवंत असतांना दगडानें मारणारे व त्यांच्या

पश्चात् त्यांच्या स्मृतींचा गुणगौरव करणारे पुराणकालीन सेमाईट लोक म्हणजे खरोखर प्रकृतीच्या ह्या सहजप्रवृत्तियुक्त, बुद्धिरहित तत्त्वाचें मूर्तिमंत प्रतीक होत. प्राचीन भारतीय लोक अंत्यज व द्विज असा जो भेद करीत त्यांतील पहिल्या प्रकारास ह्या आधिभौतिक माणसाचें वर्णन लागूं पडेल. अंत्यज, प्रकृतीचें कनिष्ठ काम बजावतो; पण तिच्या उच्च प्रक्रियांचा पाया सुनिश्चित करीत असतो. परंतु द्वितीय जन्माच्या वैभवाचे दरवाजे त्याचेसाठीं सहजासहजीं उघडत नाहींत.

आतां हेंहि खरें आहे कीं, भूतकालामध्यें होऊन गेलेल्या महान् धार्मिक क्रांत्यांमुळें रूढ कल्पनांवर जेवढी आध्यात्मिकता लादली गेलेली आहे, त्याचा मात्र भौतिक मानव स्वीकार करतो. आपल्या सामाजिक व्यवस्थेमध्यें पुरोहिताला व विद्वान् ज्योतिषाला, फारसें परिणामकारक नसलें तरी एक मानाचें स्थान तो देतो आणि सुरक्षित व सामान्य आध्यात्मिक खाद्य तो पुरवील म्हणून त्यावर विश्वास टाकतो. परंतु असें असलें तरी आध्यात्मिक अनुभवाचे व आध्यात्मिक जीवनाचें खरें स्वातंत्र्य प्रस्थापित करूं पाहणाऱ्या पुरुषास मात्र तो आधीं मानत नाहीं, व मानलेंच तर धर्म सांगणाऱ्या पुरोहिताच्या वस्त्रानें तो त्याला मान्यता द्यावयास तयार नसतो तर संन्याशाची कफनी बहाल करून त्याला तो वाटेला लावतो. त्यानें आपलें धोकेबाज स्वातंत्र्य पाहिजे तर समाजाच्या बाहेर जाऊन गाजवावें असें त्यास वाटतें. म्हणजे तडिताघात परतविणाऱ्या, घरावरील विद्युत्-दंडाप्रमाणें चैतन्याची बीज आपणांकडे खेंचून सामाजिक इमारतीचें रक्षण करण्याकरितां बाहेरच्या बाहेर ती दूर फेंकावी अशी त्याची या संन्याशाकडून अपेक्षा असते. असो.

इतकें असलें तरी आधिभौतिक मनावर प्रगतीच्या रूढीचा, जागृत संक्रमणाच्या संवयीचा, 'सतत प्रगति करणें हा जीवनाचा एक शाश्वत धर्म आहे,' ह्या धारणेचा एक संस्कार करून भौतिक मानव व त्याचें जीवन कांहीं प्रमाणांत प्रगतिशील करणें शक्य आहे. अशा प्रकारच्या प्रागतिक संस्थांचा युरोपमध्यें झालेला उदय हा वस्तुतः मनस्तत्वानें भौतिक तत्त्वांवर मिळविलेल्या महान् विजयांपैकीं एक आहे. परंतु भौतिक प्रकृतीहि ह्याचा सूड घेते; जी कांहीं प्रगति झाली असेल तिला नंतर एक ढोबळ व अगदीं बाह्य असें स्वरूप येतें; व एकादी उच्च प्रकारची वा वेगवान् प्रगति करण्याचा जर समाजानें प्रयत्न केला तर त्यामुळें त्याला फार मोठा शीण येतो, लवकरच थकावट येते व धक्का देणाऱ्या प्रतिक्रिया येतात.

तसेंच, जीवनाच्या सर्व व्यवस्था व रूढ क्रिया यांचा धार्मिक भावनेनें स्वीकार करण्याची संवय लावून, आधिभौतिक मानव व त्याचें जीवन ह्यास सौम्य स्वरूपाची आध्यात्मिकता प्राप्त करून देणें हेंहि शक्य आहे. अशा प्रकारच्या आध्यात्मिक गटांची पूर्वेकडे जी निर्मिति झाली ती म्हणजे चैतन्यानें जडतत्त्वावर मिळविलेला एक विजय होय; परंतु या मध्येंहि एक दोष आहे; कारण बरेच वेळा ह्यांतून केवळ एक धार्मिक प्रवृत्ति, आध्यात्मिकतेचा बाह्य आकार निर्माण होतो, अशावेळीं आध्यात्मिकतेनें उच्चतर किंबहुना अत्यंत भव्य व प्रभावशाली आविष्कारहि, सामाजिक जीवनांतून दूर निघणाऱ्या आत्म्यांचीच संख्या वाढवून समाजजीवन दरिद्री बनवतात अथवा क्षणिक उसळीनें समाजांत ढवळाढवळ करतात. वस्तुस्थिति अशी आहे कीं, मानसिक प्रयत्न व आध्यात्मिक प्रेरणा ही एकमेकांपासून विभक्त राहून भौतिक प्रकृतीच्या प्रचंड प्रतिक्रियेवर मात करूं शकणार नाहींत. मानवतेमध्यें संपूर्ण बदल घडवून आणल्यानें

तिला सोसाव्या लागणाऱ्या कष्टास अनुमति देण्यापूर्वी त्या प्रयत्नांत मानसिकता व आध्यात्मिकता यांचें संपूर्ण संगनमत होण्याची भर ती घालते; पण वरील दोन प्रतिनिधी एकमेकांस आवश्यक त्या सवलती देण्यासच सामान्यतः तयार होत नाहींत.

सौंदर्याभिरुचि, नीतिमत्ता व बुद्धि ह्या विषयींच्या कार्यावर मानसिक जीवन केंद्रित झालेलें असतें. मन हें तत्त्वतः आदर्शवादी व पूर्णत्वाचें शोधक आहे. (–अंतःप्रज्ञ तेजस्वी आत्मन् हा स्वप्नस्थित पुरुष होय.–मांडूक्यो. ४) परिपूर्ण सौंदर्याचें, सर्वोत्कृष्ट वागणुकीचें, पूर्ण सत्याचें स्वप्न रंगवावें, सनातन तत्त्वांचें नवनवीन स्वरूप शोधावें, अथवा त्याच्या पुरातन तत्त्वांना नवीन उजळा द्यावा हाच शुद्ध मनस्तत्त्वाचा गाभा आहे. परंतु जडतत्त्वाच्या विरोधाला कशी टक्कर द्यावी हें त्याला कळत नाहीं. त्याठिकाणीं मन अडखळतें. कमकुवत व अपात्र ठरतें, घोटाळून प्रयोग करत करत काम करतें आणि त्या प्रयोगामध्यें एकतर संघर्षापासून त्याला पराङ्मुख व्हावें लागतें वा कठोर रुक्ष परिस्थितीला शरण जावें लागतें. क्वचित् प्रसंगीं भौतिक जीवनाचा अभ्यास करून व सामन्याच्या अटींना मान्यता देऊन एकादी कृत्रिम पद्धत तात्पुरती लादण्यांत तें यशस्वीहि होतें. परंतु अनंतरूपिणी प्रकृती लवकरच त्या पद्धतीची चिरफाड करून ती फेंकून देते; किंवा किंचितहि ओळखतां येणार नाहीं अशी तिला विद्रूप करते. अथवा आपली मान्यता मागें घेऊन एकाद्या मृत ध्येयाच्या शवाप्रमाणें सोडून देते. जगानें ज्यांचा आनंदानें स्वीकार केला आहे, ज्यांची पुनः पुनः आठवण काढून तें रंगतें व रोमरोमांत ज्यांचा जयजयकार करण्यास तें उतावीळ असतें अशीं मानवानें सत्यसृष्टींत उतरविलेलीं स्वप्नें खरोखर फारच थोडीं व क्वचित् आढळणारीं आहेत.

विचारवंताची वृत्ति, व प्रत्यक्ष जीवन ह्यांमधील अंतर सामान्यतः ज्यावेळीं फारच मोठें असतें त्यावेळीं त्याचा परिणाम असा होतो कीं, स्वतःच्या प्रांतांत जास्त स्वातंत्र्यानें वावर करतां यावा या उद्देशानें मन हें आपणांस जीवनापासून एकप्रकारें दूर करून घेतें. आपल्याच तेजस्वी स्वप्न सृष्टींत विहार करणारा कवि, कलेंत तन्मय झालेला कलाकार, एकांतांत बुद्धीच्या गहन कूटांबद्दल विचार करीत बसणारा तत्त्ववेत्ता, केवळ आपला अभ्यास व प्रयोग यांत दंग असणारा शास्त्रज्ञ वा व्यासंगी विद्वान् हे पूर्वीच्या काळीं बहुधा बौद्धिक मार्गांतील संन्यासीच असून, आजहि बरेच वेळां तशीच स्थिति नसते असें नाहीं. मानवतेसाठीं त्यांनीं जें कार्य केलें आहे त्याची साक्ष सर्व इतिहास देतच आहे.

परंतु अशा प्रकारचा एकांतवास हा कांहीं विशिष्ट कार्याकरतांच मान्य होऊं शकतो. मन ज्यावेळीं जीवनाला गवसणी घालतें व त्याच्या शक्यता आणि प्रत्याघात ह्यांचा विशालतर स्वयंपूर्णतेसाठीं सारखाच उपयोग करून घेतें, तेव्हांच वास्तविक त्यास स्वतःची शक्ति व कार्य ह्यांच्या पूर्णत्वाचा खरा बोध होऊं लागतो. भौतिक जगांतील अडचणींशीं टक्कर देत असतां बाकीच्या नैतिक घडणीला दृढ आकार प्राप्त होतो व वागणुकीचे महान् आदर्श प्रस्थापित होतात. व्यावहारिक सत्यांशीं संबंध आल्यानें कलेला चैतन्य प्राप्त होतें, विचार-क्षेत्रांतील निष्कर्ष निश्चित होतात, तत्त्ववेत्त्यांच्या सिद्धांतांची, शास्त्र व अनुभव ह्यांच्या स्थिर भक्कम पायावर बैठक बसूं लागते.

परंतु अशा प्रकारें जीवनांत मिसळून जाणें हें केवळ व्यक्तिगत मनाच्या लहरीखातर होऊन त्यांत भौतिक अस्तित्वाचें स्वरूप किंवा मानववंशाची उन्नति ह्यांची सर्वस्वी उपेक्षा

होऊं शकेल. अशा प्रकारची उपेक्षा ही आपण एपिक्युरियन सांप्रदायांत अगदीं शिगेला पोंचलेली पाहतो व स्टोइकांमध्येंहि ती सर्वस्वी नसते असें नाहीं. इतकेंच काय परंतु परोपकारवादीहि आपलें भूतदयेचें कार्य बरेंच वेळां जगासाठीं न करतां केवळ स्वतःसाठींच करत असतात. परंतु हाहि विकास मर्यादित होय. मनुष्याचा आत्मा ज्यानें प्रकाशित झाला आहे त्या सत्य, सौंदर्य, न्याय, सदाचार ह्या आदर्शांचें प्रतिनिधित्व करूं शकतील अशा नवीन स्वरूपाच्या धार्मिक, वैचारिक, सामाजिक वा राजकीय रचना करून त्यांद्वारां ज्यावेळीं मानवजातीचें भौतिक जीवन बदलण्याचा प्रयत्न प्रागतिक मन करतें अथवा स्वतःच्या आचारविचारांची छाप दूरवर रुजवावी व त्यामधून सर्वच मानववंशाची उन्नति साधावी असा महान् प्रयत्न करते, त्यावेळीं वस्तुतः प्रागतिक मनाची उदात्तता दिसून येते. अशा महान् कार्यक्षेत्रांत अपयशाला कांहींच किंमत नाहीं; कारण तसा नुसता प्रयत्नहि प्रभावी व विधायक असतो. जीवनाचा स्तर उंचावण्यासाठीं चाललेली मनाची धडपड म्हणजे मनाहून वरिष्ठ असणाऱ्या शक्तींचा जीवनावर विजय होण्याची पूर्वतयारी व साक्ष आहे.

(अपूर्ण)

—श्रीअरविंद

---

# अनातोल फ्रांसचे देवावरील आक्षेप

अनातोल फ्रांस ह्या सुप्रसिद्ध फ्रेंच लेखकाची ओळख सुशिक्षित वाचकांना नव्यानें करून द्यावयाची जरुर नाहीं. त्यांच्या एका पुस्तकांत ब्रोत्तो नांवाच्या एका वाह्यात टिंगलखोरानें लॉंगमार नांवाच्या एका सालस पाद्री साहेबापुढें देवाची पुढीलप्रमाणें चेष्टा केली आहे. ब्रोत्तो साळसूदपणें पाद्रीसाहेबांना विचारतो कीं, "फादर, आजकालचें जग किती वाईट आहे हें तुम्ही पहाताच. तुमच्या म्हणण्याप्रमाणें जर खरोखरीच जगांत देव असेल तर तो ह्या सर्व अनिष्टांचा नाश कां बरें करीत नाहीं? ह्याचा अर्थ फक्त येवढाच होतो कीं, तुमच्या देवाची हें सर्व अनिष्ट दूर करण्याची कदाचित् इच्छा असेल पण बिचारा करूं शकत नाहीं. अथवा तो अनिष्ट दूर करूं शकतो पण तसें करण्याची त्याची इच्छा नाहीं. किंवा तसें करण्याची त्याची इच्छा आहे आणि तो करूंहि शकतो अथवा त्याची तशी इच्छाहि नाहीं आणि तो करूंहि शकत नाहीं. आतां असें पहा कीं, इच्छा असूनहि जर देव अनिष्ट दूर करूं शकत नसेल तर तो सर्वशक्तिमान् आहे असें तुम्ही कसें म्हणता? बरं, समर्थ असूनहि जर देव हें अमंगल दूर करूं इच्छित नसेल तर त्याला विपरीत कर्ता, विकृत मनोवृत्तीचा, म्हणावें लागेल. जर का हें सर्वमंगल करण्याची देवाची इच्छाहि नसेल आणि तसें करण्याची त्याच्यांत शक्तीहि नसेल तर देव अर्थात्च विपरीत कर्ता आणि असमर्थ दोन्हींहि आहे. तुम्ही म्हणाल कीं, 'छे, छे; आमचा देव सर्वसमर्थ आहे आणि हें सर्व अमंगल दूर करण्याचा त्याचा संकल्पहि आहे'; तर मग तसें तो कां करीत नाहीं?

ब्रोत्तोनें (फ्रांसनें) केलेली देवाची ही चेष्टा एकदां श्रीअरविंदांच्या नजरेस आणण्यांत आली आणि त्यावर त्यांचा अभिप्राय विचारण्यांत आला. तेव्हां श्रीअरविंद म्हणतात, "खरेंच, अनातोल फ्रांस हे फार विनोदी आहेत. मग त्यांची व्याजोक्ति देवधर्माविषयीं असो, स्वतःला बुद्धिजीवि म्हणविणाऱ्या माणसाविषयीं आणि मानवतावादाविषयीं असो, अथवा मानवाची तर्कनिष्ठा आणि त्याच्या एकंदर व्यवहारांतील फोलपणा दाखवितांना असो. पण मला वाटतें, जगाच्या कारभारांत ढवळाढवळ न करण्याच्या बाबतींत देवानें अनातोलला काय उत्तर दिलें हें कदाचित् तुम्हांला ठाऊक नसेल. एकदां असें झालें कीं, कुठल्याशा स्वर्गांत ह्या देवाची आणि अनातोलची अचानक गांठ पडली.......तेव्हां देव त्याला म्हणाला, 'हें बघ अनातोल, परवां तूं माझी जी चेष्टा केलीस ना, ती मला तर फार आवडली बुवा. पण या सृष्टीच्या व्यवहारांत मी हस्तक्षेप कां करत नाहीं सांगूं का? गंमत अशी झाली कीं, एकदां बुद्धि (reason) माझ्याकडे आली आणि म्हणाली कीं "देवा, आपल्या अस्तित्वाच्या थापा तूं उगाच कशाला मारतोस? तुला ठाऊक आहे का कीं, ह्या जगांत तुझें अस्तित्व कधींहि नव्हतें आणि नाहीं. यदाकदाचित् तूं जर खरोखर असशील, तरी तुझ्यामुळें ह्या जगाची आज इतकी दैना झाली आहे कीं यापुढें आम्ही हें मुळींच सहन करणार नाहीं. एकदां का इथून तुझा कांटा निघाला कीं पहा पृथ्वीवर कशी सुबत्ता आणि सुव्यवस्था नांदेल ती. माझी मुलगी विज्ञान (science) आणि मी, आम्ही दोघींनीं सर्व बेत अगदीं आंखून ठेवलाय. त्यामुळें, सृष्टीचा मुकुटमणि असा हा मानव गौरवानें आपली मान वर करील. दृढ आत्मविश्वास, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, समत्व इत्यादि गुणयुक्त अशा त्या स्वावलंबी मानवापेक्षां या पृथ्वीवर अधिक श्रेष्ठ काय बरें असूं शकेल? देव, देवता, धर्म, मंदिरें, पुजारी, राजे रजवाडे, इत्यादींचें येथून पूर्ण उच्चाटन होईल. लढाया, दारिद्र्य आणि नाना तऱ्हेनें होणारे प्रजेचे हाल, यांचें अस्तित्वहि येथें रहाणार नाहीं. मग भांडण तंट्याला कुठें जागा आहे, सांगा. उद्योगधंद्यामुळें येथें सर्वत्र भरभराट होईल, कुठल्याहि वस्तूची कमतरता पडणार नाहीं. व्यापार तर खुद्द लक्ष्मीलाच येथें ओढून आणील. सार्वत्रिक शिक्षणानें सर्व अज्ञानांधःकार दूर होईल आणि कोणत्याहि खुळचट कल्पनांना येथें मुळींच थारा मिळणार नाहीं. माणूस सुसंस्कृत, शिस्तबद्ध, बुद्धिनिष्ठ आणि तर्कशुद्ध विचारवंत बनेल. नेहमीं उचित निर्णय घेईल. पंडित आणि विद्वान् यांच्या मार्गदर्शनाखालीं पृथ्वीवर जणुं स्वर्गच अवतरेल. परिपूर्ण समाजरचना निर्माण होईल, वैद्यक शास्त्राचा विकास होऊन सर्व प्रजा दीर्घ आयुरारोग्यसंपन्न होईल; आदर्श नागरिकत्वाचा नमुना बनेल. परमोच्च बिंदु गांठलेल्या विकसित सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् विज्ञानानें प्रभावित झालेल्या मानवाचें या पृथ्वीवर अधिराज्य होईल.

जगाचें अनादि गूढ आतां उकललें आहे. साऱ्या समस्या सुटल्या आहेत. अखिल जगताचें एक राज्य झालें आहे..... अंतःकरणाच्या कनवाळुपणामुळें श्वेतवर्णी लोक आपल्या मागासलेल्या पीतवर्णी आणि रक्तवर्णी बांधवांचा उद्धार करीत आहेत. सगळीकडे आनंदी आनंद झाला आहे. सर्वत्र शांति! शांति!! शांति!!!"

बरं का अनातोल, बुद्धीनें हें असें कांहीं बहारदार वर्णन केलें कीं काय सांगूं! तिनें रेखाटलेलें जगाचें हें अतिरम्य चित्र पाहून मला फार बरें वाटलें; कारण आतां मला कांहीं

करावें लागणार नव्हतें. मी एकदम बाजूस झालों. माझा स्वभाव तुला ठाऊकच आहे. शक्यतों मी कुठेंच ढवळाढवळ करत नाहीं. पडद्यामागें राहून काम करणेंच मला जास्त पसंत आहे. पण काय भानगड झाली आहे कुणास ठाऊक, मी असें ऐकत आहे कीं, त्या मायलेकींना हें काम जमलेलें दिसत नाहीं, त्यांना वचन कांहीं पाळतां आलेलें दिसत नाहीं. याचें काय कारण असेल बरें? हें असें कां? म्हणजे सर्व मंगल करण्याची बुद्धीची मर्जी फिरली काय? कीं आपल्या मुलीची मदत घेऊनहि तिला हें काम करणें शक्य नाहीं? कदाचित् तिची इच्छाहि नसेल आणि तिच्यांत सामर्थ्यहि नसेल. किंवा तिची मर्जी असूनहि आणि तिच्यांत शक्ति असूनहि तिनें तसें केलें नसेल. आणि काय रे अनातोल, बुद्धीचीं हीं इतर पोरें तूं पाहिलीस का? हें सरकार, ही कारखानदारी, हा पुंजीवाद, हा समाजवाद अबब! काय भयंकर दिसताहेत एकएक जण! जणुं कांहीं विज्ञानाचें संघटनारूपी शस्त्र व तीक्ष्ण बुद्धिमत्तेचीं अस्त्रें घेऊन सुसज्ज झालेले राक्षसच! आणि बिचारी प्रजा! राजे महाराजे यांच्या जांचांतून सुटलेली ही प्रजा ह्या राक्षसांच्या आमदानींत कांहीं अधिक सुखी आणि स्वतंत्र दिसत नाहीं. काय झालंय् तरी काय? का असें म्हणावें कीं, स्वतःला सर्वश्रेष्ठ समजणारी ही बुद्धीहि प्रमादातीत नाहीं आणि माझ्यापेक्षांहि भयंकर घोंटाळा तिनें ह्या पृथ्वीवर माजवलाय्? !!!"

येथें देवाचा आणि अनातोलचा संवाद संपला. काय संवाद घडला तो मी आपला सांगितला. अर्थात् अनातोलच्या ह्या देवाशीं माझा कांहीं परिचय नाहीं. घटकाभर त्याच्याकडून मी त्याला उसना घेतला एवढेंच.

—श्रीअरविंद

(पत्रसंग्रह खंड ३ मधून)

Sri Aurobindo : CWSA : Letters on Poetry and Art

---

# सत्यनिष्ठा

(मागील अंकावरून पुढें)

## —ऋजु-भाव—

हनुमन्ताच्या सैन्यांतील वानरें व अस्वलें, भगवान् रामचंद्र आणि लक्ष्मण यांचेसाठीं, राक्षसांचा राजा रावण याच्याशीं लढत होतीं. या सैनिकांनीं चारी बाजूंनीं केलेल्या आघातांनीं रावण घायाळ झाला असतां, त्यांतून सुटका करून घेण्यासाठीं त्यानें मायेचा-कपटविद्येचा-आश्रय केला. त्याच्या मायेच्या प्रभावानें, क्षणांत त्याच्या भोंवतींच्या राक्षसांच्या सैन्यांत अनेक रामचंद्र व अनेक लक्ष्मण निर्माण झाले. मायेनें उत्पन्न झालेल्या त्या निव्वळ भ्रामक आकृति होत्या. पण त्या पाहून वानरांना आणि अस्वलांना ते खरोखरचेच राम-लक्ष्मण आहेत असें

वाटलें आणि तीं आश्चर्यचकित होऊन लढायचीं थांबलीं. आपल्या प्रिय रामलक्ष्मणावर-सेनापतींवर ते शिळा व वृक्ष यांचा भडिमार कसा बरें करतील ?

ते असे गांगरून गेलेले पाहून आसुरी आनंदानें रावण हंसला. रामानेंहि स्मित केलें. कारण रावणाचा कपटीपणा उघडकीला आणून सत्याचा विजय तो घडवून आणणार होता. त्याचा त्याला आनंद होत होता. आपल्या नित्य-विजयी धनुष्यावर अमोघ बाण चढवून रामानें तो शत्रुसैन्यावर सोडला. भ्रामक मूर्तींना भेदून बाण सर्रकन् पुढें जात असतां त्या मूर्ती हवेंत विरून गेल्या. हनुमन्ताच्या सैन्याला रावणाची युक्ति कळून आली आणि पुनः नव्या उत्साहानें त्यांनीं लढण्यास सुरुवात केली.

सत्यवादी माणसाच्या अंतःकरणापासून निघणारे बोल त्या बाणाप्रमाणेंच, असत्य आणि ढोंग यांचा समूळ नाश करून टाकतात.

★

पूर्वी दक्षिण भारतांत मालतीराज नांवाचा एक राजा राज्य करीत होता. तो प्रसन्न मनानें हंसला म्हणजे मोगऱ्याच्या फुलांचा सुवास कित्येक मैल पर्यंत दरवळत असे. पण जर त्यानें मुद्दाम, मनाला समाधान नसतांना हंसण्याचा प्रयत्न केला तर असें घडत नसे. पण खुल्या दिलानें हंसल्यानंतर मात्र जणुं सुगंधी फवारा उडल्याप्रमाणें वाटे. त्याच्या या सुगंधी हास्याचें श्रेय त्याच्या सरळ अंतःकरणाला होतें.

★

दुर्योधनाच्या राजमंदिरांतील चौरंग अत्यंत उंची असत. चमकदार हिरे, पाचू आणि माणकें जडविलेल्या सोन्या-चांदीच्या ताटांनी ते जास्तच खुलून दिसत. एकदां भगवान् कृष्णाला राजा दुर्योधनानें भोजनाचें आमंत्रण दिलें होतें. पण त्यावेळीं तो त्याचेकडे न जातां दरिद्री शूद्र भक्तानें दिलेलें निमंत्रण त्यानें स्वीकारलें. तेथील अन्न आणि भांडींकुडीं सर्वच अगदीं साधें होतें. पण श्रीकृष्णानें जाणून बुजूनच दुर्योधनाच्या पक्वान्नाचा अव्हेर केला व विदुराच्या घरच्या कण्या खाल्ल्या. कारण, विदुरानें त्याला खऱ्याखुऱ्या प्रेमानें बोलाविलें होतें. उलट, केवळ आपल्या वैभवाचें प्रदर्शन करण्याच्या उद्देशानें श्रीकृष्णास दुर्योधनानें आमंत्रण दिलें होतें.

★

मर्यादा-पुरुषोत्तम रामचंद्राबद्दलहि अशीच एक कथा सांगतात. शबरी नांवाच्या गरीब भिल्लीणीच्या हातचें त्यानें खाल्लें. वीरश्रेष्ठ श्रीरामचंद्राला थोडयाशा फळांशिवाय ती काय देऊं शकणार ? तिच्याजवळचीं हीं फळें तिनें इतक्या प्रेमानें दिलीं कीं, रामाला त्यानें भरून आलें. अगदीं मनापासून दिलेल्या देणगीचें विस्मरण होऊं नये अशी त्याची इच्छा होती आणि म्हणूनच आजहि शतकामागून शतकें लोटलीं तरी ती कथा लोक पुनःपुनः मोठ्या प्रेमानें सांगत असतात.

★

जलाल नांवाचा एक प्रसिद्ध विद्वान् उपदेशक होता. एकदां दोन तुर्क त्याचा उपदेश ऐकण्यासाठीं, त्याला देणगी घेऊन त्याचेकडे आले. अगदीं गरीब होते ते; त्यामुळें त्यांची देणगीहि अगदींच साधी होती. मूठभर मसुराची डाळ ! ती पाहून कित्येक शिष्य त्यांच्याकडे तुच्छतेनें पाहूं लागले. पण जलाल त्यांना म्हणाला,—

—"महंमद पैगंबराला त्याची एक मोठी योजना पार पाडण्यासाठीं एकदां पुष्कळ पैसे पाहिजे होते. त्यानें आपल्या शिष्यांना शक्य तितकें द्रव्य देण्याची विनंति केली. कोणीं त्याला आपल्या संपत्तीचा अर्धा भाग दिला. कोणीं तिसरा हिस्सा अर्पण केला. अबू बकर यानें आपली सर्वच संपत्ति देऊन टाकली. त्यामुळें महंमदाला पुष्कळ घोडे व शस्त्रास्त्रें घेतां आलीं. नंतर एक गरीब बाई आली. खजुराच्या तीन बिया व भाकरीचा एक तुकडा तिनें महंमदाला अर्पण केला. तें पाहून पुष्कळ लोक हंसूं लागले. पण पैगंबर त्यांना म्हणाले, "काल रात्रीं मला एक स्वप्न पडलें, देवदूतांनीं हातांत एक तराजू घेतला होता. एका पारड्यांत सर्व श्रीमंतांनीं दिलेलीं दानें आणि दुसऱ्या पारड्यांत त्या निर्धन स्त्रीनें दिलेल्या खजुराच्या तीन बिया आणि रोटी घालून ते वजन करत होते; तेव्हां दोन्हीं पारडीं सारख्या वजनाचीं झाल्यामुळें तराजू समतोल राहिला होता."—

आणि त्यावर जलाल म्हणाला: "अगदीं मनापासून, ऋजु भावानें, अंतःकरणपूर्वक अर्पण केलेली अगदीं लहानशी देणगीहि मोठ्या किंमतीच्या देणगी इतकीच थोर आहे."

हे ऐकून त्या दोघां तुर्कांना अत्यंत आनंद झाला. यापुढें मात्र दुसऱ्या कोणालाहि त्या मूठभर मसुराच्या डाळीला हंसण्याचें धैर्य झालें नाहीं.

*

हलक्या जातीचा एक पारधी आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठीं शिकार शोधत दिवसभर रानांत वणवण हिंडला. पण त्याला कांहीं मिळालें नाहीं. संध्याकाळ झाली तरी तो जंगलांतच भटकत होता. तहानेनें व भुकेनें व्याकुळ होऊन तो एकटाच हिंडत होता. दिवसभराची सर्व धडपड वायां गेल्यामुळे अधिकच थकून गेला होता तो. एकादें पक्षाचें घरटें सांपडतें कां हें पाहण्यासाठीं तो एका बेलाच्या झाडावर चढला. पण तेथेंहि त्याला कांहीं मिळालें नाहीं. आतां मात्र त्याचे डोळे पाणावले. आपण कांहीं खायला घेऊन येऊं, या आशेनें आपलीं बायकामुलें वाटेकडे डोळे लावून बसलीं असतील याची त्याला आठवण झाली.

आपल्या स्वतःच्या दुःखामुळें आलेल्या अश्रूंपेक्षां दयेनें ओघळलेले अश्रू खरोखर अमोल आहेत आणि असाधारण सामर्थ्यसंपन्न आहेत.

त्या दयाशील व्याधाच्या डोळयांत अश्रू ओघळले आणि बेलाच्या पानांवर पडले आणि तीं पानें त्याच झाडाच्या बुंध्याशीं स्थापलेल्या शिवलिंगावर पडलीं. त्याचक्षणीं त्या पारध्याला साप चावून तो मरण पावला. लगेच यमाच्या दूतांनीं त्याच्या आत्म्याला देवलोकांत नेऊन शंकरापुढें उभें केलें.

त्याला पाहून स्वर्गांतील देव म्हणाले, "याच्या आत्म्याला येथें बिलकुल जागा नाहीं. हलक्या जातीचा पारधी हा. धर्मविधींचा गंधहि त्याला नाहीं. खाऊं नये तें तें त्यानें खाल्लें आहे. देवांना चुकून सुद्धां त्यानें नैवेद्य दाखविलेला नाहीं."

सर्व देवांचें बोलणें ऐकून शंकर म्हणाले, "आज त्यानें मला बिल्वपत्रें वाहिलीं आणि आपल्या अंतःकरणपूर्वक अश्रूंचें सिंचन केलें. निष्पाप सरळ अंतःकरणाच्या माणसाची जात कसली पाहतां येथें !"

असें म्हणून भगवान् शंकरांनीं त्याला स्वर्गलोकांत स्थान दिलें.

*

सर्व देशांत आणि सर्व युगांत थोर व्यक्तींनीं आणि देवांनींहि ऋजुभावनेचाच आदर केलेला आहे. ते सर्व बाबतींत सत्याचेच भोक्ते होते. हेंच या सर्व गोष्टींतून स्पष्ट होत आहे.

खोटेपणानें वागणारा माणूस हा मानवजातीचा शत्रूच होय.

तत्त्वज्ञान, ज्योतिष, गणितशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान ह्या सर्वांच्या द्वारां मनुष्य सत्याचाच शोध करीत असतो. पण केवळ मोठ्या गोष्टींतूनच नव्हे, तर, लहानसहान गोष्टींतहि सत्यनिष्ठेची आवश्यकता आहे. मुलांनो, खरें बोलण्याची संवय लावून घेण्यासाठीं वयानें मोठें होण्याची वाट पहात बसूं नका. खरें बोलण्याच्या व्रतपालनास जितकी लवकर सुरुवात कराल तितकें चांगलें. नेहमींच सत्य बोलण्याची संवय लावून घेऊन ती सबंध आयुष्यभर टिकवावयाची असेल तर त्याला तसा अभ्यासहि सतत करावा लागतो.

तीव्र इच्छा असूनहि कित्येकदां खरें बोलणें लोकांना अवघड होऊन बसतें. कारण नेहमींच सत्य बोलावयाचें तर सत्याचें स्वरूप प्रथम कळलें पाहिजें. तें शोधून काढलें पाहिजे. पण ही गोष्ट वाटतें तितकी सोपी नाहीं.

*

काशीच्या राजास चार पुत्र होते. आपल्या वडिलांच्या सारथ्याला त्यांनीं एकदां सांगितलें, 'आम्हाला पळसाचें झाड पहावयाचें आहे.' तो म्हणाला, "हो, दाखवीन मी." नंतर एकदां त्यांतील थोरल्या राजपुत्रास घेऊन तो सारथी वनामध्यें गेला.

अरण्यांत गेल्यावर सारथ्यानें राजपुत्रास पळसाचें झाड दाखविलें. त्या ऋतूंत पळसास पानें-फुलें मुळींच नव्हतीं. त्यामुळें राजपुत्रास वठलेलाच वृक्ष फक्त दिसला.

कांहीं महिन्यांनंतर, दुसरा मुलगा रथांतून रानांत फिरावयास गेला असतां त्यानें पानांनीं भरलेला पळसाचा वृक्ष पाहिला.

नंतर कांहीं दिवसांनीं तिसऱ्याची पाळी आली; आणि फुलांनी लालबुंद झालेला वृक्ष त्यानें पाहिला.

शेवटीं चौथ्या मुलानें पळस पाहिला तेव्हां तो फळांनीं भारावला होता.

एकदां ते चौघे जमले असतां एजकण म्हणाला, "खरेंच, पळसाचें झाड कसें लालबुंद दिसतें, नाहीं ?"

"नाहीं ! तें वठलेल्या झाडासारखें दिसतें." मोठा मुलगा म्हणाला.

"नव्हे ! नव्हे ! पळस वृक्ष रुंद रुंद पानाच्या केळीच्या झाडासारखा दिसतो." दुसऱ्या राजपुत्रानें प्रतिपादलें.

तिसरा राजपुत्र उद्गारला, "गुलाबाचे गुच्छच जणुं, लटकलेले असतात पळस वृक्षाला."

चौथा म्हणाला, "अहं ! बोरीसारखीं फळें त्याला लटकलेलीं असतात."

आपसांतील मतभेद त्यांना मिटवितां येईनात. म्हणून ते सर्वजण आपल्या वडिलांकडे गेले, कोणाचें खरें हें विचारायला.

निरनिराळ्या वेळीं त्या सर्वांनीं वृक्ष पाहिलेला आहे हें लक्षांत येऊन राजा हंसून म्हणाला, "तुम्ही सर्वजण बरोबर आहांत. पण तुम्ही सर्वजणच विसरलेले दिसतां कीं, सर्व ऋतूंत झाड सारखेंच रहात नाहीं."

आपण जें प्रत्यक्ष पाहिलें तेंच प्रत्येकजण सांगत होता. पण इतरांनाहि काय माहीत आहे हें त्यांना ठाऊक नव्हतें.

अशाच प्रकारें पुष्कळदां, मनुष्याला सत्याचा अंशभागच माहीत असतो. पण त्याला मात्र असें वाटत असतें कीं, आपल्याला सर्वच्या सर्व सत्य माहीत आहे; आणि त्याचमुळें त्याच्या हातून चुका होतात.

सत्यप्रेमानें प्रेरित होऊन लहानपणापासूनच निरंतर सत्यशोधनांत लोक राहतील तर चुकांचें प्रसंग खरोखरी कितीतरी कमी होतील.

★

हिमालय प्रदेशांतील कुमायू येथील राजा अल्मोरा टेकडीच्या पायथ्याशीं घनदाट जंगलामध्यें शिकारीसाठीं गेला होता.

एका झाडाच्या ढोलींतून एक ससा बाहेर पडला. राजा त्याच्या मागें लागला. पण त्या सशाचा एकदम वाघ झाला व तो नाहींसा झाला.

राजा आश्चर्यचकित झाला. राजदरबारांत त्यानें पंडितांची सभा बोलाविली; आणि या घटनेचा अर्थ लावावयास सांगितलें.

विद्वान लोक म्हणाले, "जेथून वाघ नाहींसा झाला त्या ठिकाणीं महाराजांनीं नवें नगर वसवावें, असा या अद्भुत घटनेमागें अर्थ आहे. कारण, जेथें माणसाची वस्ती व्हावयाची असते तेथून वाघ पळून जातात."

नवें नगर वसविण्याचें काम सुरु झालें. जमिनीचा कणखरपणा पारखण्यासाठीं मोठाल्या पहारी घेऊन लोक खणूं लागले. त्याच वेळीं अचानक, जमीन थोडीशी हादरली.

"थांबा, थांबा", विद्वान् लोक ओरडूं लागले "पृथ्वीचा भार धारण करणाऱ्या शेषाच्या अंगांत तुमच्या या पहारा शिरल्या. आतां येथें शहर वसवितां कामां नये."

पुढें कथा अशी सांगतात कीं, जमिनींतून जेव्हां पहारा बाहेर काढल्या तेव्हां शेषाच्या रक्तानें खरोखरीच त्या माखून निघाल्या होत्या.

राजा म्हणाला, "हें अशुभ लक्षण आहे खरें ! पण आपण तर शहर वसविण्याचा निश्चय केला आहे. तेव्हां कांहीं झालें तरी शहर वसविलेंच पाहिजे."

विद्वान् लोकांचा संताप झाला आणि त्या भरांत त्यांनीं सांगून टाकलें. "या शहरावर एकादें भयंकर संकट कोसळेल आणि लवकरच राजवंश नाश पावेल."

पण ती जमीन अत्यंत सुपीक निघाली. गांवाला पाणीहि भरपूर लाभलें. सहाशें वर्षें

'अलमोरा' नावाचें गांव तेथें वसलें आहे; आणि भोंवतालचा प्रदेश फळाफुलांनीं समृद्ध आहे.

अशाप्रकारें त्या विद्वानांची भविष्यवाणी खोटी ठरली. ते मनाचे सरळ होते, त्यांचा हेतूहि चांगला होता, याबद्दल शंकाच नाहीं. कारण, त्यांना जें खरें वाटत होतें तेंच तें सांगत होते. पण पुष्कळदां माणसें अशीं चुकतात व भोळ्या समजुतींनाच सत्य समजतात.

बाळांनो, अंध विश्वासानें आणि भोळ्या समजुतींनीं हें जग भरलेलें आहे. पण सत्य-शोधनाचा उत्तम व सोपा मार्ग म्हणजे नेहमीं सत्यनिष्ठ रहावयाचें, सरळ अंतःकरणानें वागाव-याचें. काया-वाचा-मनानें अधिकाधिक सत्याचरण करीत रहावयाचें. कारण ज्यावेळीं आपण दुसऱ्याची फसवणुक करूं इच्छित नाहीं त्यावेळीं इतरांकडूनहि फसविले जाण्याची भीति आपल्याला रहात नाहीं.

—श्रीमाताजी

CWMCE Vol 02 : Page 218

---

# वाचकांचे प्रश्न

(वाचकांनीं आपआपले प्रश्न पाठवावेत)

**लहान मूल नकळत बाहेरच्या जगाचे बरे वाईट संस्कार घेतच असतें. ह्या संस्कारांचा त्याच्यावर परिणाम होऊं नये व त्याचें जीवन आध्यात्मिक व्हावें यासाठीं काय काळजी घ्यावी ?**

बालकाचें मन, शरीर, आत्मा यांची निकोप वाढ व्हावी, सर्वांगीण विकास व्हावा या-साठीं कडेचें एकंदर वातावरण अनुकूल राखणें आवश्यक आहे हें तर खरेंच. पण त्याहि आधीं तें प्रत्यक्ष ज्या वातावरणांत वावरत असतें तें वातावरण शुद्ध राखणें, हीन वासना आणि विकार यांनीं तें गढूळ होऊं न देणें अधिक जरूरीचें आहे. या गोष्टींपासून बालकाचें मन नेहमीं अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याचाच अर्थ, बालकाच्या भोंवतालच्या मोठ्या व्यक्तींचें जीवन शुचिर्भूत, सात्विक असलें पाहिजे. सत्य, सौंदर्य, सुसंवाद आणि प्रेम या उच्चतर मूल्यांना कौटुंबिक जीवनांत महत्त्वाचें स्थान असलें पाहिजे.

अशा वातावरणांत स्वभावाचे हिणकस भाग वाढीस लागत नाहींत. अनिष्ट प्रवृत्ती बळावत नाहींत. बाहेरच्या जगाच्या बऱ्या-वाईट संस्कारांतून आपोआपच चांगले संस्कार तेवढे स्वीकारले जातात आणि आत्म्याच्या सुप्तशक्तींना बहरण्यास आवश्यक ती प्रेरणा मिळते. हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, लहान मूल नेहमीं दुसऱ्याच्या जीवनाच्या उदाहरणानें अधिक लवकर व सहजपणें शिकत असतें. म्हणूनच पालकांनीं केवळ उपदेश नव्हे तर प्रत्यक्ष आच-रण करून मुलांसमोर आदर्श उभा केला पाहिजे. कारण अशाच वागणुकीच्या दर्शनानें लहान

मूल सदा सर्वकाळ न कळत अनायासानें संस्कार ग्रहण करीत असतें. विशेषतः याच गोष्टी त्याच्या मनावर खोल जाऊन उमटत असतात.

बालकाची आध्यात्मिक वाढ व्हावी, त्याच्यांतील आध्यात्मिक संभाव्यतांना वाव मिळावा, त्याच्या आत्म्याच्या गुणांचा आविष्कार व्हावा, या दृष्टीनें बालकाला प्रोत्साहन देण्याची मनीषा असेल तर अर्थातच त्यासाठींहि योग्य असें वातावरण निर्माण केलें पाहिजे. प्रार्थना, भजन-पूजन, सद्ग्रंथांचें वाचन हे परंपरेनें चालत आलेले उपायहि उपयुक्तच आहेत. पण या ठिकाणींहि हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, विकसित होत असलेल्या आत्म्यास योग्य तो आकार देण्याच्या कामीं सर्वांत जास्त जर कशाचा परिणाम होत असेल तर तो म्हणजे भोंवतालच्या वातावरणांत आध्यात्मिक जीवन जगणाऱ्या व्यक्तीच्या सत्संगाचा.

पण या सर्व गोष्टी केवळ साह्यभूत होणाऱ्या गोष्टी आहेत हें आपण विसरतां कामां नये. एकाद्या आत्म्याचें या पृथ्वीवर नियतकार्य काय आहे, त्यानें कोणत्या हेतूनें जन्म घेतलेला आहे, देहामध्यें प्रवेश करतांना कोणत्या प्रकारचे अनुभव घेण्याचा त्यानें संकल्प केला आहे यावरच मुख्यतः सर्व कांहीं अवलंबून आहे, आणि सामान्यतः आपल्या हेतुपूर्तीसाठीं अनुकूल असेंच वातावरण जन्म घेण्यासाठीं आत्मा निवडीत असतो.

★

**जीवनांतील कोणत्याहि घटनेचें प्रत्यक्ष ज्ञान जसें आपणांस होऊं शकतें, तसेंच प्रत्यक्ष ज्ञान, जन्म आणि मृत्यु या घटनांचेंहि, होणें शक्य आहे काय ?**

होय, शक्य आहे; पण त्यासाठीं आवश्यक असलेली जाणीव एकाद्यानें वाढविली असेल तरच त्याला तें शक्य आहे.

आपल्यांतील चेतना, आपली जाणीव संपूर्णतः जागृत करून, विशिष्ट साधनेनें ती उत्तरोत्तर शुद्ध आणि सूक्ष्म करून, आपल्या आंतरात्म्याच्या भोंवतीं, ती जाणीव केंद्रित करण्यास साधकानें शिकलें पाहिजे. त्यायोगें हा भौतिक देह, हें जड शरीर सोडतांना तो संपूर्णतः जागृत व सावध राहूं शकतो; आणि अन्य जगतांत प्रवेश करतांना, सुघटित अशा सूक्ष्मदेहासह तो जाऊं शकतो, आणि या मध्यंतरींच्या काळांतील अनुभवांची त्याला संपूर्ण जाणीव राहूं शकते. मृत्यूनंतर त्याचा सूक्ष्मदेह विघटित होत नाहीं; या सूक्ष्मदेहाचा सारभूत भाग टिकून राहिलेला असतो; त्यामुळें आवश्यक तेवढा विश्रांतीचा काळ संपल्यानंतर जेव्हां तो नवीन देह धारण करतो तेव्हां, ही कृति तो जागृत राहून करूं शकतो.

अर्थातच, ज्या व्यक्तीनें जाणीवेचा परमोच्च बिंदु गांठला असेल आणि आपल्या आत्मकेंद्राभोंवतीं या जाणीवेची सुव्यवस्थित रचना केलेली असेल अशा व्यक्तीला ही वरील प्रक्रिया, जिवंत असतांनाहि सहज करतां येईल. अशातऱ्हेच्या कथा प्राचीन वाङमयांत आहेतहि. मनांत आलें तर अशी व्यक्ति आपलें भौतिक शरीर तात्पुरतें सोडून, विकसित अशा सूक्ष्मदेहानें दुसऱ्या शरीरांत प्रवेश करून जन्म, मृत्यु अथवा अन्य कोणत्याहि तऱ्हेचे अनुभव घेऊं शकते आणि अनुभव घेऊन झाल्यानंतर पुनश्च पहिल्या शरीरांत प्रवेश करूं शकते. गूढविद्येच्या अभ्यासकांना असंभाव्य व अशक्य वाटण्याजोगें यांत कांहींच नाहीं.

★

**कांहीं योगी कित्येक दिवसपर्यंत स्वतःला जमिनीखालीं पुरून घेतात. ही सिद्धी आणि ब्रह्मसाक्षात्कार यांचा कांहीं संबंध आहे काय? अशा अवस्थेंत त्यांच्या मनाची आणि श्वासोच्छ्वासाची काय स्थिति असते?**

सामान्यतः अशातऱ्हेचे प्रयोग हठयोगी करीत असतात. आसनांच्या परिश्रमपूर्वक अभ्यासानें शरीराला वळण लावून दीर्घकालपर्यंत निश्चलपणें राहण्याची संवय त्यांनीं शरीराला लावलेली असते; श्वास आणि उच्छ्वास यांचें सातत्यानें नियमन करून शरीर आणि प्राणशक्ति यांवर त्यांनीं इतका ताबा मिळविलेला असतो कीं, त्यांचीं स्वाभाविक कार्येंहि दीर्घकाळपर्यंत त्यांना थांबवून ठेवतां येतात. जमिनीखालीं पुरून घेण्यासारख्या प्रयोगांमध्यें, प्रयोग करणारा मनुष्य प्रदीर्घ कुंभक करतो,——श्वास आंतमध्यें कोंडून धरतो. स्थूल शरीर संपूर्ण निश्चल अवस्थेमध्यें ठेवून, आपली बाह्यवर्ति कार्यकारी जाणीव आंतमध्यें खेंचून घेतो, आणि आपल्या सूक्ष्म शरीरामध्यें तो राहतो. मात्र बाह्य शरीराशीं अत्यंत आवश्यक तेवढा जाणीवेचा धागा, अत्यंत आवश्यक तेवढा संबंध त्यानें राखलेला असतो. नेहमीचें मन जणुं समाधींत गेल्यासारखें स्तब्ध रहातें.

अर्थातच या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अध्यात्माशीं कांहींच संबंध नाहीं; मग ब्रह्मसाक्षात्काराशीं तर दूरच राहो. ही एक तऱ्हेची कसरत आहे; अस्तित्वाच्या कांहीं विशिष्ट शक्तींचा असाधारण विकास त्यामध्यें झालेला असतो इतकेंच. आणि ज्याप्रमाणें आत्मा किंवा देव यांच्या अस्तित्वावर यत्किंचितहि विश्वास न ठेवतां, केवळ आवश्यक तो अभ्यास व संवर्धित प्रबल अशी संकल्पशक्ति यांच्या साह्यानें शतावधानासारख्या बौद्धिक कसरती मनुष्य करूं शकतो, तद्वतच या वरील शारीरिक कसरती तो करूं शकतो.

ब्रह्मसाक्षात्कार ही एक अगदीं वेगळी गोष्ट आहे. तिचा जाणीवेशीं अधिक निकट संबंध आहे. त्यामध्यें साधकाची जाणीव बदलून, तिचा विकास होऊन, ती ब्रह्माच्या ठिकाणीं, ब्रह्मावस्थेंत स्थित व्हावयाची असते. अज्ञानमय कार्यांत रुतलेल्या सामान्य मानवी जाणिवेनें आपलें अज्ञान टाकून देऊन दिव्य अशा जाणीवेचे गुणधर्म, सतत वाढत्या अशा विकासद्वारां, प्राप्त करून घ्यावयाचे असतात. वर सांगितलेल्या हठयोगाच्या प्रयोगांनीं व सिद्धींनीं हें जाणीवेचें रूपांतर, हा जाणीवेंतील बदल घडून येऊं शकत नाहीं. ज्या देहांत आणि प्राणशक्तीमध्यें जाणीव वसत असते, तो देह आणि ती प्राणशक्ति शुद्ध आणि सूक्ष्म करण्याच्या कार्यांत फारतर अशा सिद्धीची मदत होऊं शकेल आणि त्यामुळें बाह्य साधनांच्या द्वारां आंतून वर्धमान होणाऱ्या चैतन्याचे संस्पर्श ग्रहण करण्यास शरीर आणि प्राणशक्ति हीं अधिक लवचिक, नमनीय आणि स्वीकारक्षम होऊं शकतील. पण हेंच कार्य कमी परिश्रमांत आणि इतका ताण न देतां, दुसऱ्या मार्गांनींहि साधतां येणें सहज शक्य आहे.

*

**पूर्णावस्थेस पोंचलेल्या, साक्षात्कारी योग्याचा सर्व जगतावर ताबा चालतो, असें स्वामी विवेकानंद म्हणतात, त्याचा अर्थ काय?**

या ठिकाणीं साक्षात्कार किंवा पूर्णावस्था याचा अर्थ, आपल्या स्वतःच्या निगूढतम अशा आत्म्याशीं तादात्म्य, एकत्व प्राप्त होणें, असा आहे. अर्थात् हा आत्मा जगतांतील वस्तु-

मात्राच्या ठायीं असलेल्या आत्म्याशीं एकरूप पावलेला असतोच. स्वतःची जाणीव, चेतना क्रमाक्रमानें वाढवत जाऊन विश्वात्मक जाणीवेशीं, विश्वब्रह्माशीं एकरूप करणें, त्याच्याशीं समरस करणें हाहि साक्षात्कार किंवा पूर्णावस्था याचा अर्थ होऊं शकेल. दोहोंपैकीं कोण-ताहि अर्थ घेतला तरी एक गोष्ट सारखीच आहे. विश्वाच्या मुळाशीं असलेल्या भगवंताशीं, दिव्यतेशीं, अशी व्यक्ति एकरूप पावलेली असते : विश्वाचें आधिपत्य करणाऱ्या दिव्य संकल्पा-शीं तिचा संकल्प एकत्व पावलेला असतो. अर्थातच भगवंताची संकल्पशक्ति ही सर्वसमर्थ व अबाधित असल्यानें त्याचा परिणाम म्हणून अशा व्यक्तीची इच्छाहि, ईश्वरी इच्छाशक्ती-प्रमाणेंच होते. त्याची इच्छा ही भगवंतानेंच त्याच्याठिकाणीं केलेली इच्छा असते. प्रत्यक्ष भगवंताचीच ती इच्छा असते.

—रेवान्

---

## व्यक्तीचें खरें मूल्य

**"ऐहिक दृष्टया तुम्ही कोणीच नाहीं, पण पारमार्थिक दृष्टया, आध्यात्मिक दृष्टया तुम्ही सर्व कांहीं आहांत", ह्या श्रीअरविंदांच्या उद्‌गारांचा अर्थ काय ?**

जीवनाला जें कांहीं मूल्य असतें तें केवळ आत्म्यामुळें, दिव्य चैतन्यामुळें, आध्यात्मिक जाणिवेमुळें आणि भगवत्सान्निध्याच्या अनुभूतीमुळें असतें, असा ह्याचा अर्थ. हें आत्मभान आणि भगवत्सान्निध्याची अनुभूति या विना जीवन फोल आहे, निरर्थक आहे.

व्यक्तीच्या बाबतींतहि असेंच म्हणतां येईल. भौतिक, व्यावहारिक दृष्टया मनुष्य किती कां कर्तबगार असेना, ह्याची भौतिक परिस्थिति किती कां आदर्श असेना त्याच्या ठिकाणीं आत्मभान व ईशसान्निध्याचा अनुभव ज्या प्रमाणांत असेल तेवढीच त्याची किंमत.

याचाच अर्थ असा कीं, सत्य दृष्टीनें पाहतां, वस्तूच्या सत्य स्वरूपाच्या दृष्टीनें पाहतां, कांहींहि संपत्ति जवळ नसलेला माणूस, डोळ्यांत भरणारी कोणतीहि कर्तबगारी नसलेला माणूस, किंवा कर्तबगार होईल अशी आशा करण्यास ज्याच्या बाबतींत मुळींच जागा नाहीं असा माणूसहि, जर स्वतःच्या आंतरात्म्याच्या अस्तित्वाविषयीं जागृत असेल आणि स्वतःच्या ठिकाण-च्या भगवत् अंशाशीं सतत युक्त राहूं शकत असेल तर तो आंतरात्म्याविषयीं पूर्ण अज्ञानांत अस-णाऱ्या एखाद्या पृथ्वीपति सम्राटापेक्षां किंवा कोटयाधीश धनिकापेक्षां अनंतपटीनें श्रेष्ठ म्हण-तां येईल. सत्यदृष्टीनें पाहतां, आध्यात्मिक दृष्टया वरवरच्या व बाह्य गोष्टींना खरी किंमतच नाहीं. केवळ एक दिव्यतेचें भान आणि आत्म्याशीं सतत तादात्म्य यांनाच खरी किंमत आहे.

—श्रीमाताजी

# दिव्य जीवन

(क्रमशः)

ज्या मानवानें अतिमानस आध्यात्मिक जाणीव प्राप्त करून घेतली आहे त्याचें सर्व जीवन आध्यात्माचें अनुभवलेलें सत्य व्यवहारांत मूर्त करण्याच्या स्वरूपाचेंच असणार. या जीवनांत त्या गोष्टीचेंच केवळ स्वागत होणें शक्य आहे, जी स्वतःचें रूपांतर करूं शकेल, जी स्वतःचा आध्यात्मिक आत्मा, त्या महान् अतिमानसिक आत्म्याच्या पोटांत आहे हें ओळखूं शकेल किंवा त्या महान् सत्यालाच आपला आत्मा करूं शकेल आणि जी, त्या सत्याची स्वाभाविक सुसंवादिता आपली करूं शकेल, जी, आपलें स्वत्व वितळवून त्याला त्या महान् सत्याशीं पूर्ण सुसंवादी असा आकार देऊं शकेल. आपल्या मानसिक जीवनांतील कोणत्या गोष्टी याप्रमाणें अतिमानस जीवनाचा भाग होऊं शकतील हें ठरविणें मनाचें काम नाहीं, तें मनाकडून होणार नाहीं. अतिमानस ज्ञान (विज्ञान) आपलें सत्य खालीं धाडील आणि हें सत्य आमच्या मन-प्राण-शरीरांच्या ध्येयांत आणि सिद्धींत त्याचा जो कांहीं अंश साकार केला गेला असेल तो वरच्या जीवनासाठीं उचलून घेईल. अर्थात् मानसिक जीवनांत या सत्याला जे आकार दिले गेले ते आकार तें सत्य जगावयास योग्य ठरविलच असें नाहीं; कारण नव्या जीवनांत त्या अंशानें सोयीनें रहावयाचें तर त्याच्या जुन्या आकारांत कांहीं बदल करावा लागेल, किंवा त्याला नवा आकार देऊन त्याच्या जुन्या आकाराला बाजूला ठेवावें लागेल, असा पुष्कळ संभव आहे. वरील मन-प्राण-शरीराच्या आदर्शांत आणि सिद्धींत व त्यांना दिलेल्या आकारांत देखील जें, सत्य आणि शाश्वत असेल त्याला, अवश्य तें रूपांतर करून जगविलें जाईल. मानवी जीवनांत जें आज स्वाभाविक समजलें जातें त्यापैकीं पुष्कळसा भाग, अतिमानस जीवनासाठीं निवड करतांना, फेंकून दिला जाईल, नाहींसा केला जाईल. मनाच्या आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांत मानवानें पुष्कळशा मानसिक मूर्ती, कृत्रिम तत्त्वें आणि संप्रदाय, अन्योन्य-विरोधी आदर्श उभें केले आहेत, ते अतिमानस प्रकाशांत मान्यता द्यावयास किंवा आदर करावयास पात्र ठरतील असें नाहीं—अपात्रच ठरतील, असा संभव आहे. दर्शनीं ठीक दिसणाऱ्या या प्रतिमांत कांहीं सत्य कोठें कदाचित् लपलें असेल तर तेवढें सत्य मात्र किंवा तेवढीं सत्यें मात्र अतिमानस जीवनांत, मानसिक जीवनाहून फारच व्यापक पायावर अधिष्ठित असलेल्या सुसंवादी सुरेल जीवनांत, त्याचे अंगभूत घटक म्हणून समाविष्ट करून घेतलीं जाण्याचा संभव आहे. हें उघड आहे कीं, अतिमानस जाणिवेनें शासित केलेल्या जीवनांत युद्धाला आणि राजकीय झगड्याला तगून रहावयाला कांहींच कारण नाहीं. विरोधाची आणि वैराची वृत्ति, क्रूरता, विध्वंस, अडाणी अत्याचार या गोष्टी युद्धाच्या आधारभूत व अंगभूत असतात; कायमचा बेबनाव आणि संघर्ष, वारंवार करण्यांत येणारा जुलूम, अप्रामाणिक व्यवहार, नीचता, स्वार्थ, अज्ञान, मूर्खता, गोंधळ या गोष्टी राजकीय झगड्याच्या आधारभूत व अंगभूत असतात; म्हणून अतिमानस जीवनांत राजकीय झगडा आणि युद्ध असणार नाहीं, कारण त्यांच्या आधारांना व अंगांना त्या जीवनांत स्थान नाहीं. आमच्या आजच्या कला, हुन्नर

त्या जीवनांत टिकून राहतील, अर्थात् त्यांचा हेतु आणि कार्य, मनाची किंवा प्राणाची (वासनांची) हीन दर्जाची करमणुक, हें असणार नाहीं; फुरसतीचा वेळ मजेंत जावा, कंटाळलेल्या उदासलेल्या मनाला उत्तेजक, आल्हादक कांहींतरी असावें, विरंगुळा, विसांवा देणारे कांहींतरी असावें या हेतूनें आजचे कलाहुन्नर टिकविले जाणार नाहींत; तर आत्म्याचें महान् सत्य, अस्तित्वांतील सौंदर्य व आनंद यांच्या उदयाची, निर्मितीचीं साधनें म्हणून कलाकुसर उपयोगी पडतात; तसेंच अंतरंगांत उदयास आलेलें, निर्माण झालेलें आध्यात्मिक सत्य, सुख, सौंदर्य बाह्य सृष्टींत व्यक्त करण्यासहि कलाकुसर उपयोगी पडतात; या दोन उपयोगासाठीं अतिमानस जीवनांत ते टिकविलें जातील. प्राण ( शक्तिमय वासनामय सूक्ष्म देह ) आणि शरीर ( स्थूल शरीर ) अतिमानस जीवनांत जुलमी धन्यासारखे वागणार नाहींत, आजच्याप्रमाणें जीवनाचा नऊ दशांश हिस्सा आपल्या स्वतःच्या तृप्तीसाठीं खर्च करावयाची सक्ति करणार नाहींत, तर आत्मतत्त्वाच्या अभिव्यक्तीच्या शक्ती बनतील, अभिव्यक्तीचीं साधनें बनतील. त्या बरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जड भौतिक द्रव्य, स्थूल शरीर यांना ज्याअर्थी अतिमानस जीवनांत जागा देण्यांत येणार, त्या अर्थी भौतिक वस्तूंचा योग्य उपयोग करणें, त्याजवर ताबा ठेवणें ही गोष्ट पार्थिव प्रकृतींत अभिव्यक्त झालेल्या त्या आध्यात्मिक अतिमानस जीवनाचा एक आवश्यक भाग होईल.

अशी बहुतेक सर्वांची कल्पना आहे कीं, आध्यात्मिक जीवन अवश्यमेव संन्यासी काटकसरीचें जीवन असलें पाहिजे; केवळ शरीर-धारणाकरितां लागणाऱ्या अगदीं आवश्यक वस्तू सोडून बाकी सर्व वस्तूंचा त्याग अशा जीवनांत केला पाहिजे. जें आध्यात्मिक जीवन मुळांतच हेतु पुरस्सर संसारांतून निवृत्त होण्याच्या स्वरूपाचें आहे त्या आध्यात्मिक जीवनाला वरील कांटकसरीची आणि त्यागाची कल्पना लागूं आहे, त्या जीवनाच्या संबंधांत ती खरी आहे. ही आध्यात्मिक जीवनाच्या आदर्शाची गोष्ट सोडली तरी ज्याला आध्यात्मिक जीवनाची ओढ लागली आहे, जो त्या जीवनाकडे वळला आहे, त्याला या वळणामुळेंच अतिशय साधेपणानें राहणें अवश्य आहे, असें वाटण्याचा संभव आहे. कारण बाकीच्यांचें सारें जीवन प्राणगत वासनापूर्तीचें आणि शरीराचे कोड पुरविण्याचें असणार. परंतु या विचारसरणींत जो आध्यात्मिकतेचा सांचा गृहीत धरला आहे तो, विशाल दृष्टीनें पाहतां, मनानें निर्मिलेला सांचा आहे; वासना हीच जेथें प्रेरक शक्ति आहे त्या अज्ञानाच्या (अर्धवट ज्ञानाच्या) व्यवहार–नियमाच्या आधारावर, त्या नियमाकडे लक्ष देऊन मनानें आध्यात्मिकतेचा वर सांगितलेला सांचा निश्चित केला आहे, हें उघड आहे. अज्ञानाचा विरोध मोडून काढणें, अज्ञानावर विजय मिळविणें, अहम् पुसून टाकणें, हें जेथें ध्येय आहे, तेथें केवळ वासनाच नव्हे तर वासनातृप्तीच्या साऱ्या वस्तू सर्वथा टाकून देण्याचें तत्त्व अगदीं बरोबर ठरेल. परंतु हा सांचा किंवा मनानें निर्मिलेला कोणताहि सांचा वा नमुना सर्वश्रेष्ठ किंवा अखेरचा होऊं शकत नाहीं. तसेंच असा नमुना वासनेच्या पार वरती चढून गेलेल्या आणि तेथें स्थायी झालेल्या जाणिवेला बंधनकारक नियमासारखा बांधूं शकत नाहीं. या अतिमानसिक जाणिवेच्या प्रकृतींतच अणु-अणूंत पूर्ण पावित्र्य आणि पूर्ण संयम असतो. गरीबी असो, श्रीमंती असो, या गुणांत अणुमात्र बदल होत नाहीं. या जाणीवेंत गरीबी-श्रीमंतीमुळें संयम व पावित्र्य हदरून कमी पडूं शकलें, कलंकित होऊं शकलें तर ती जाणीव खरी अतिमानसिक जाणीव नव्हे,

निदान पूर्णतेनें ती अतिमानसिक झालेली नाहीं असें समजावें. अतिमानसिक जीवनाचा नियम एकच, अगदीं एकच, आणि तो हा कीं, तें जीवन दिव्य आत्म्याचें स्वयंकृत आविष्करण असावयाचें, त्याच्या इच्छेची स्वयंकृत अभिव्यक्ति असावयाची. हें आविष्करण, ही अभिव्यक्ति, अतिशय साधेपणा, अतिशय संकीर्णता आणि विपुलता किंवा यांच्या मधली स्वाभाविक समतोलाची स्थिति, यांपैकीं कशाच्याहि द्वारां होऊं शकते; कारण सौंदर्य आणि सुबत्ता, वस्तुजाताच्या अंतरांत लपलेलें माधुर्य व हास्य, विपुल प्रकाशमय आनंदमय जीवन, या गोष्टींतहि दिव्य आत्म्याची शक्ति आहे, अभिव्यक्ति आहे. अतिमानसिक क्षेत्रांत सर्वांच्या अंतरीं असलेला, सर्व दिशा व्यापून असलेला दिव्य आत्मा, आपल्या प्रकृतीचे नियम दिशेदिशेला योग्य ते ठरविण्याचे व त्याबरोबर सहजच तिच्यावर अधिष्ठित असलेल्या जीवनाची चौकट, त्याचा तपशील, त्याचा परिसर——सर्व कांहीं निश्चित करण्याचें काम करतो. अतिमानसिक पातळीवर सर्वत्र सर्वांच्या बाबतींत एकच लवचिक तत्त्व, वर सांगितलेला जीवनाचा एकच एक नियम लागू असतो; मनाच्या पातळीवर वस्तुजाताची व्यवस्था लावतांना कडक, न बदलतां येणारा नमुना, कित्ता घालून देणें व त्याप्रमाणें जीवन राबवून घेणें अवश्य असतें; असा कडकपणा आध्यात्मिक जीवनाच्या नियमांत असूं शकत नाहीं. स्वत्वाचा आविष्कार अनेक प्रकारांनीं पूर्ण स्वातंत्र्यानें तेथें करतां येतो; मात्र या विविधतेचा पाया व आधार, सर्वांची अंतर्यामांतील एकता, हा असतो; अर्थात् सर्वत्र सुसंगति, सुव्यवस्था, सुसंवाद यांचें दर्शन, या विविध स्वतंत्र आध्यात्मिक जीवनांत, स्वभाविकपणें घडतें.

विज्ञानमय जीवांच्या जीवनांत, अन्न-प्राण-मनोमय जीवांहून श्रेष्ठ अशी अतिमानस जाणीव, विकासक्रमानें उदयास येऊन स्थिर झालेली असते. या अतिमानस जाणिवेनें व्यापलेल्या व चाललेल्या विज्ञानमय जीवनाला 'दिव्य-जीवन' असें वैशिष्टयदर्शक नांव देणें युक्त होईल; या नांवास तें पात्र आहे; कारण त्या जीवनाची बैठक, जीवाच्या अंतर्यामीं असलेल्या दिव्य सद्वस्तूच्या, दिव्य आत्मतत्त्वाच्या अंतर्यामांत असते. जड प्रकृतींत विकासक्रमानें व्यक्त झालेला दिव्य आत्मिक प्रकाश, सत्ता, आनंद प्राथमिक स्वरूपांत याच जीवनांत प्रथम प्रतीत होतो. मानसिक पातळीवरचें जें सामान्य मानवी जीवन, त्याहून हें जीवन, वरच्या पातळीवरील असल्यानें त्याला आत्मिक, अतिमानसिक, अतिमानवी जीवनहि म्हणतां येईल. परंतु या जीवनाला अतिमानवी जीवन म्हणतांना, आजच्या आणि पूर्वींच्या अतिमानवतेच्या कल्पनांचा, या जीवनांतील अतिमानवतेशीं घोंटाळा होणार नाहीं अशी खबरदारी घ्यावयास हवी. मनानें कल्पिलेली अतिमानवता, वर सांगितलेल्या अतिमानसिक अतिमानवतेहून अगदीं वेगळी असते. सामान्य मानवाहून मानवी गुणांत खूप वरचढ होणें, गुणांचा प्रकार तोच पण गुणाकार, गुणांचा आकार बेहद्द मोठा करून सर्वांच्या डोक्यावर बसणें, व्यक्तित्व, व्यक्ति–वैशिष्टच विस्तृत करणें, अहम् मर्यादेबाहेर फुगवून ठेवणें, बौद्धिक सामर्थ्य आणि वासना–सामर्थ्य वाढवतां येईल तेवढें वाढविणें, मानवी अज्ञानाच्या ( अर्धवट ज्ञानाच्या ) ज्या अंगभूत शक्ती, त्या अतिरेकी प्रमाणांत मिळवून त्या दर्शनीं सफाईदार, सूक्ष्मकार्यक्षम किंवा भारी वजनदार अवजड करणें–हे सर्व मनानें कल्पिलेल्या अतिमानवतेच्या कमाईत येतें; अतिमानव हा सामान्य मानवतेवर प्रभावी प्रभुत्व गाजवितो असेंहि मनोरचित अतिमानवतेच्या कल्पनेंत सामान्यतः ध्वनित केलें जातें. नित्शे या जर्मन तत्त्ववेत्त्यानें अतिमानवतेची कल्पना वरील-

प्रमाणें मांडलेली आहे. ही अतिमानवता अत्यंतच वाईट कल्पावयाची म्हणजे गोऱ्या पशूचें, काळ्या पशूचें, कसल्या तरी, या ना त्या कोणत्याहि पशूचें धांगडधिंग्याचें राज्य कल्पावयाचें. —अर्थात् ही पराकोटीची मानवता म्हणजे परत रानटी बळाचा, रानटी क्रूरतेचा, रानटी जुलुम–जबरदस्तीचा उदय किंवा अवतार होय. परंतु यांत विकासाचें, प्रगतीचें नांव नाहीं. ही परागति आहे. जुना आडदांड रानटीपणा परत डोक्यावर बसवून घेणें आहे. अथवा असें म्हणतां येईल कीं, राक्षस किंवा असुर पैदा करणें हा अतिमानवता कमावण्याचा अर्थ आहे. मानवता, स्वतःच्या सामान्य स्वरूपाच्या पलीकडे जाण्याचा, त्याच्या पार होऊन त्याच्यापेक्षां श्रेष्ठ स्वरूप घेण्याचा अटीतटीचा खटाटोप भलत्या दिशेनें करूं लागली कीं या खटाटोपांतून राक्षस किंवा असुर पैदा होतो; त्याचें नांव अतिमानव असतें इतकेंच. राक्षसी अतिमानवांत प्राणिक (वासनिक) मी हा अतिरेकी वाढ झालेला असतो; हा अतिरेकी मी भयंकर अत्याचारप्रेमी व दंगलबाज असतो. आपली स्वतःची इच्छापूर्ति करण्याची त्याच्यांत अफाट शक्ति असते. वाटेल तसा पराकोटीचा जुलूम करून, वाटेल तसें अराजक माजवून तो आपली तृप्ति करून घेतो. तेव्हां, राक्षसी अतिमानव म्हणजे वरील प्रकारचा अतिरेकी वासनिक मी होय. अशा प्रकारचा राक्षस, विश्वभक्षक राक्षस आजहि कोठें कोठें टिकून आहे, तथापि त्याचा स्वभावधर्म, जुन्या युगाचा स्वभावधर्म आहे; आजच्या युगाचा नव्हे. आज अशाच नमुन्याचा, पण गुणावगुणांनीं याहून जबरदस्त राक्षस निर्माण होऊं शकतो. पण असा राक्षस निर्माण करणारा विकासक्रम हा खरा पुढें जाणारा किंवा उंच जाणारा क्रम नसून मागें किंवा खालीं जाणारा विकासक्रम आहे; अर्थात् संकोचक्रम आहे. राक्षसी अतिमानवाची ही गोष्ट झाली. आतां आसुरी अतिमानव कसा असतो तें पाहूं. हा राक्षसाप्रमाणें केवळ वासनिक (प्राणिक) मी नसतो, तर वासनिक आणि मानसिक मी या दोहोंचा बनलेला संयुक्त मी असतो आणि त्याला उदात्त स्वरूप दिलेलें असतें. आसुरी अतिमानवांत किंवा असुरांत विरोधाला तुडवून टाकणारें अपार सामर्थ्य असतें, त्याचें मन आणि प्राण शक्तिमान् आणि समर्थ असतात, तथापि त्यांत उथळपणा, स्वैरपणा, असंयम असत नाहीं; आत्मशासित, आत्माधीन, केव्हां केव्हां अगदीं संन्याशाप्रमाणें आत्मनियंत्रित असें त्याचें वागणें असतें. असुर बलवान् व शांत, थंड व उग्र असे प्रचंड आवेशाचे सांठे असतात. ते धूर्त असतात, सत्ताप्रिय असतात. परंतु पृथ्वीवर भूतकाळांत असे असूरहि भरपूर होऊन गेले. इतके कीं, त्यांचें अस्तित्व नको नकोसे झालें. असे असुर आणखी पैदा होणें म्हणजे जुन्या जीवनाला दीर्घकाळ पावेंतों टिकवीत रहाणें होय. या आसुरी अतिमानवाच्या जीवनानें पृथ्वीला तिच्या भवितव्याबाबत कांहींहि खरा लाभ होणें शक्य नाहीं. त्या जीवनानें पृथ्वीला तिच्या हल्लींच्या मानवी स्वत्वापलीकडे उडी घेतां येणार नाहीं. आज महान् असामान्य शक्तीचा असुर निर्माण झाला तरी पृथ्वीवरील जीवनाच्या कक्षेची पातळी जुनीच राहील; तिच्या फेरीचें वर्तुळ प्रचंड होईल इतकेंच. तेव्हां इत्यर्थ हा कीं जुन्या काळांत शोभून गेलेली विकासाच्या भूतकालीन टप्प्यांत अपरिहार्यपणें उदयास आलेली अतिमानवता आज आम्हांला पुनरुत्थापित करावयाची नाहीं. ही जुनी अतिमानवता निर्माण करण्यापेक्षां एका दृष्टीनें आजचें कार्य अधिक सोपें आहे. पण एका दृष्टीनें अधिक अवघड आहे. आम्हाला विकासयत्नानें जें आज उदयास यावयास हवें आहे—आणि जें उदयास येणार आहे तें जुन्या अति-

मानवापेक्षां, म्हटलें तर साधें, सुसाध्य आहे, म्हटलें तर दु:साध्य आहे; आम्हाला आत्म-साक्षात्कारी जीव उदयास यावयास हवा आहे; अन्नमय, प्राणमय, मनोमय 'स्व' चा साक्षात्कार नव्हे (या 'स्व' चा साक्षात्कार आम्हाला आहे च.) तर त्याचे पलीकडील, त्याचेहून उच्चपातळीवरील विज्ञानमय 'स्व'चा किंवा आध्यात्मिक 'स्व'चा साक्षात्कार हवा आहे. हाच 'स्व' खरा आत्मा होय. विकासयत्नानें आम्हाला आमच्या अंतरांत या आध्यात्मिक 'स्व'ची जणुं बांधणी, उभारणी करावयाची आहे. आमच्या मनोमय 'स्व' मध्यें, मनोमय आत्म्यामध्यें या अतिमानस 'स्व' च्या, खऱ्या आत्म्याच्या बांधणीसाठीं, उभारणीसाठीं तीव्र आकांक्षा, उभारी आम्ही उत्पन्न करावयाची आहे; आणि या तीव्र उभारीनें केलेल्या त्यनाच्या द्वारां आमच्या खऱ्या आत्म्याला प्राकृतिक बंधनांतून, पडद्यांतून मोकळें करून त्याचा प्रकाश, त्याचें सामर्थ्य, त्याचें सौंदर्य आम्हांला सार्वभौम चक्रवर्तीच्या सिंहासनावर बसवावयाचें आहे; हें आम्ही घडवून आणलें म्हणजे आम्ही आमच्या आध्यात्मिक स्व ची, (खऱ्या आत्म्याची) बांधणी केली, खरी अतिमानवता संपादन केली असें होईल, खऱ्या आत्म्याचा साक्षात्कार करून घेतला असें होईल. वर उल्लेखिलेली आत्म्याची सार्वभौम सत्ता म्हणजे अहंमय अतिमानव किंवा राक्षस यांनीं मानवतेवर जबरदस्तीनें स्वार होऊन गाजविलेली मानसिक, प्राणिक सत्ता नव्हे; ही सार्वभौम सत्ता आत्म्यानें आपल्या करणोपकरणावर, आपल्या शरीर-प्राण-मनावर गाजवावयाची असते. याप्रमाणें खऱ्या आत्म्यानें स्वत:चा म्हणजे साधनरूप, करणरूप "आत्म्यांचा" ताबा घ्यावा, त्यांच्या साह्यानें जीवनाचा ताबा घ्यावा, मानवतेला नवी, अतिमानसिक जाणीव, आत्म्याची जाणीव लाभावी हें आम्हांला घडवून आणावयाचें आहे; मानवतेचें आत्मोल्लंघन, आत्मपूर्ति, या जाणीवेच्या संपादनांत आहे. कारण ही जाणीव मानवतेच्या ठिकाणीं येणें म्हणजे, तिच्या उदरीं येण्यासाठीं जी दिव्य सद्वस्तु विकासयत्नाच्या मिषानें खटाटोप करीत आहे तिनें त्याचें ठिकाणीं आपणहून केलेलें आपलें आविष्करण होय. हें आविष्करण, ही अभिव्यक्ति जिच्या ठिकाणीं झाली आहे ती मानवता हीच एक खरी अतिमानवता होय. विकासाच्या वाटचालींत प्रकृति आज जेथें येऊन पोहोंचली आहे तेथून खऱ्या रीतीनें पुढें पाऊल टाकावयाचें तर या खऱ्या अतिमानवतेच्या दिशेनेंच तें पाऊल टाकलें जाणें शक्य आहे; इतर कोणत्याहि दिशेनें नाहीं.

—श्रीअरविंद

# श्रीमाताजींचीं प्रवचनें

१

## श्रीअरविन्दांचें कार्य

भगवंत तीन अवस्थांमध्यें रहातो. शुद्ध अस्तित्व, शुद्ध चैतन्य, शुद्ध आनंद––सच्चिदानंद या तीन मूलभूत घटकांतूनच जगाची उत्पत्ति झालेली आहे. या तिन्ही अवस्था, हे तिन्ही घटक प्रत्येक वस्तूमध्यें, प्राणिमात्रामध्यें सर्वत्र, अस्तित्वाच्या सर्व क्षेत्रांत आणि सर्व पातळींवर विद्यमान असतात. सच्चिदानंद ही सर्वश्रेष्ठ सत्ता आहे. तिच्या पार्श्वभूमीवरच सर्व कांहीं अस्तित्वांत आहे. येथें मनस्तत्त्वाच्या पाठीमागें, प्राणतत्त्वाच्या पाठीमागें एवढेंच नव्हे तर शारीर जडतत्त्वाच्या पाठीमागें आणि या भिन्नभिन्न क्षेत्रांतील प्रत्येक आकारामागेंहि ह्याच 'सच्चिदानंदा'चा आधार आहे. अखिल वस्तुमात्राला धारण करणारे, त्यास आधार देणारें, त्यास शक्ति प्रदान करणारें तत्त्व म्हणजे हें सच्चिदानंद. अशी वस्तुस्थिति असल्यानें, त्या सच्चिदानंदाचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं, त्याची प्राप्ति करून घेण्यासाठीं हें मन-प्राण-शरीरयुक्त अस्तित्व सोडून देऊन त्याच्या पलीकडे कुठें तरी उंच, त्यापासून दूर जाण्याची आवश्यकता नाहीं. सामान्यतः, सच्चिदानंदाचा शोध करणारा साधक विश्वाच्या बाहेर, या सृष्टीच्या पलीकडे सृष्टीपासून कोठेंतरी दूर, विश्वातीत अशा ठिकाणीं सच्चिदानंदाचा शोध घेतो. पण या सच्चिदानंदाची गांठभेट वास्तविक कोठेंहि होऊं शकेल. मनुष्य ज्या कोणत्या भूमिकेवर असेल, मानसिक, वासनामय किंवा भौतिक, ज्या प्रकारचें जीवन तो जगत असेल त्या कोणत्याहि जीवनांत त्याला सच्चिदानंदाचा लाभ होऊं शकेल; त्याकरतां मनुष्यानें फक्त अंतर्मुख होऊन अंतरंगांत प्रवेश केला पाहिजे. केवळ वरवर न पहातां जाणीवेच्या पाठीमागें जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे––तेथें त्याला सच्चिदानंदाचें निरंतर सान्निध्य अनुभवास येईल. भौतिक जीवनद्वारां भौतिक अस्तित्वामध्येंहि सच्चिदानंदाचा अनुभव येणें ही गोष्ट, मानसिक, वासनामय इत्यादि दुसऱ्या पातळींवर त्याचा अनुभव घेण्यापेक्षां तितकीशी अवघड नाहीं किंवा तितकीशी दुःसाध्य नाहीं. पण भौतिक जीवनांत त्याचा अनुभव आल्यानंतर तो सतत निरंतर आणि संपूर्ण जागृत राहून टिकविणें व भौतिक दृष्टीनें उपयुक्त अशी ती एक वस्तु बनविणें ही गोष्ट तेवढी कठीण आहे.

त्यासाठींच श्रीअरविंदांचा जन्म होता आणि आपणांसहि तेंच करावयाचें आहे.

२

## प्रथम दर्शनीं आकर्षण

**कांहीं व्यक्तींविषयीं प्रथम दर्शनींच आकर्षण वाटतें तर कांहीं विषयीं तिरस्कार वाटतो. असें कशामुळें घडतें ?**

सामान्यतः परस्परांमधील प्राणमय जीवनांतील साधर्म्यामुळें अशाप्रकारें एकाद्याबद्दल प्रथम

दर्शनींच आकर्षण वाटत असतें इतकेंच. कांहीं अशा प्राणमय, भावनामय लहरी असतात, ज्या आपल्या स्वभावाशीं जुळत्या मिळत्या असतात व दुसऱ्या अशा कांहीं लहरी असतात, ज्या आपणाशीं विधर्मी व विसंवादी असतात. हा असा केवळ लहरी लहरींचा खेळ असतो; दुसरें कांहीं नाहीं. एक प्रकारें हें एक भावनात्मक जीवनाचें रसायनशास्त्रच आहे म्हणा ना !

यापेक्षां दुसरीं कांहीं अधिक खोल कारणें असल्यानेंहि अशाप्रकारें आकर्षण वाटूं शकतें. पण हें समजण्यासाठीं व अनुभवण्यासाठीं मनुष्याची जाणीव अधिक प्रगल्भ व स्पष्टदर्शी झाली पाहिजे. कारण अशा बाबतींत एक प्रकारच्या आंतरिक आत्मानुभूतीचाहि आधार या आकर्षणामागें असतो. आपणांसारखीच आकांक्षा व जीवनध्येय बाळगणाऱ्या व्यक्ती कोण आहेत, आपल्या जीवनयात्रेंतील सह-प्रवासी कोण आहेत किंवा आपल्याहून भिन्न असा जीवन-मार्ग कोणाचा आहे, आपणांस विरुद्ध व कदाचित् आपल्या प्रगतीस अपायकारकहि ठरणाऱ्या प्रवृत्ती कोणामध्यें आहेत हें अशा आंतरिक अनुभूतीमुळें आपणांस स्पष्ट दिसूं शकतें. परंतु अशा-रीतीनें आंतरिक प्रत्यय येण्यासाठीं आपली आध्यात्मिक प्रगति व आपला सर्वांगपूर्ण विकास यावरच आपल्या मनाच्या सर्व प्रवृत्ती सतत केंद्रित झाल्या असल्या पाहिजेत. पण सामान्यतः अशी आपल्या मनाची स्थिति नसते. शिवाय अशारीतीनें ज्यांची आंतर-दृष्टि उघडलेली आहे त्यांच्या बाबतींत हा अनुभव, आकर्षण व तिरस्कार या स्वरूपांत व्यक्त होत नाहीं, तर घटनांचें प्रत्यक्ष ज्ञान त्यांना झालेलें असल्यानें त्यांचें वागणें साहजिकपणेंच अगदीं धीर गंभीर, आत्मविश्वासपूर्ण व विवेकपूर्ण असतें. रागद्वेषादि विकारांनीं ते कृती करण्यास प्रवृत्त होत नाहींत.

यावरून, सर्वसामान्य रीतीनें व जवळजवळ निर्णायक तत्त्व म्हणून आपण असें सांगूं शकूं कीं, ज्यांच्या मनामध्यें सहानुभूति व तिरस्कार या भावनांचे आवेग अति तीव्र स्वरूपाचे असतात ते लोक मुख्यतः भावनाविवश वासनाप्रधान पातळीवरच जगत आहेत. मनोमय सहधर्मता वा विसंवादिता यांचाहि कांहीं भाग त्यांतच मिसळलेला असूं शकतो; किंवा मनाची, बुद्धीची पातळी समान असल्यामुळें आपल्या पातळीवरील इतरांबरोबर सहकार्यानें कांहीं काम करावें असें कांहीं लोकांना वाटतें. पण बौद्धिक वाढीच्या दृष्टीनें हे लोक बऱ्याच उच्च पातळीवर वावरत असतात व त्यामुळें त्यांच्या वागणुकींत एक प्रकारचा गंभीरपणा व अलिप्तता असते. भावनावेगांच्या आहारीं जाऊन ते वागत नाहींत. कांहीं व्यक्तींशीं संभाषण करण्यांत आपणांस आनंद वाटतो तर कांहीं विषयीं आकर्षणहि वाटत नाहीं आणि त्यांच्याशीं होणाऱ्या भाषणापासून कांहीं लाभहि होत नाहीं. पण अशावेळीं व्यक्तीशीं असलेले संबंध तर्कनिष्ठ बुद्धीच्या पातळीवरील असून त्यामध्यें अधिक सुस्थिरता व तटस्थता अनुभवास येते. मात्र आकर्षण व तिरस्कार या गोष्टी निश्चितपणें भावनामय, वासनाप्रधान पातळीवरीलच असतात.

भौतिक रसायनशास्त्राप्रमाणेंच प्राणमय भावनात्मक जीवनाचें एक रसायनशास्त्र असतें. वस्तूवस्तूंमध्यें आकर्षण आणि प्रतिसारण होत असतें. कांहीं पदार्थ दुसऱ्या पदार्थांत मिसळतात, तर दुसरे कांहीं पदार्थ एकमेकांजवळ आणले असतां एकदम स्फोट होतो. तसेंच हें असतें. एकादें वेळीं दोन व्यक्तींच्या प्राणमय जीवनाच्या पातळीवरील प्राणस्पंदनें परस्परांशीं इतकीं जुळणारीं असतात कीं नव्याण्णव टक्के लोक, यालाच प्रेम समजतात. त्या स्त्रीपुरुषांची अशी एकदम भावना होते कीं, "ओहो ! याच, याच व्यक्तीसाठीं माझें अंतःकरण ओढ घेत होतें. शोध करीत होतें," आणि मग दोघेहि एकमेकांवर अनुरक्त होऊन वागूं लागतात. पण नंतर त्यांच्या लक्षांत

येतें कीं, या सर्व गोष्टी वरवरच्या व तात्पुरत्या होत्या. या कारणाकरितांच, योगसाधना करावयाची इच्छा बाळगणाऱ्या साधकाला नेहमींच पहिली सूचना देतात कीं, "रागद्वेषातीत हो", "नेहमीं त्याहून उच्चतर पातळीवर मन ठेवण्याचा यत्न करीत जा." कारण या गोष्टी खरोखरीच आभासरूप असतात व त्या तुम्हांस अडचणींत पाडतात व कित्येक वेळां त्या अडचणींतून बाहेर पडणेंहि मुष्किलीचें होऊन बसतें; एवढेंच नव्हे तर अशा गोष्टींच्या नादीं लागून तुम्ही आयुष्याचा सत्यानाशहि करून घ्याल. उत्तम उपाय म्हणजे अशा भावनांकडे व गोष्टींकडे लक्षच न देणें बरें. अशा प्रसंगीं जरा अलिप्त होऊन, स्वतःच्या अंतरंगामध्यें डोकावून स्वतःस विचारा कीं, अमुक एका व्यक्तीस भेटावें आणि दुसऱ्या अमुक व्यक्तीस भेटूं नये, त्यापासून दूरच रहावें असें जें वाटतें तें काय म्हणून?" त्याचें कारण कांहीं फारसें गूढ असणार नाहीं.

तुम्ही तुमच्या साधनेमध्यें पूर्णपणें गर्क असाल तर अशी एक वेळ येईल, जेव्हां अगदीं सुस्पष्टपणें क्षणार्धांत तुम्हाला असें कळूं शकेल कीं, अमुक व्यक्ति आपल्या साधनेस साह्यकारी आहे आणि अमुक व्यक्ति अपायकारक आहे. पण ही जाणीव पुष्कळच सूक्ष्म व सुस्थिर शांत स्वभावाची असते. त्यांत आकर्षण किंवा तिरस्कार या भावनांचा गंधहि नसतो. त्यांच्या अगदीं उलटहि तिचें स्वरूप असतें. म्हणून उत्तम उपाय हा कीं, अशा गोष्टींपासून दोन पावलें दूरच रहावयाचें आणि त्यांच्या पोकळपणाविषयीं आपणच आपल्या मनाला शिकवावयाचें.

अर्थात् केवळ 'दुष्ट' स्वभावाच्या अशा कांहीं व्यक्ती असतात; दुसऱ्याला दुखविण्यांत, त्रास देण्यांत त्यांना मोठा आनंद वाटत असतो. तुम्ही जर तुमच्या खऱ्या मानवी उच्चतर पातळीवर असाल, जनावराप्रमाणें खालच्या पातळीवर नसाल; (अर्थात् या बाबतींत माणसांपेक्षां जनावरांचीच पातळी उच्च ठरते व माणसामध्येंच अधिक विकृति आढळून येते)—तर अशा अपायकारक व्यक्तींपासून अगदीं साहजिकपणेंच तुम्ही दूर रहाल. पण सुदैवानें अशा, केवळ अपायकारक स्वभावाच्या व्यक्ती किंवा प्राणी क्वचितच आढळतात. ज्यांच्यामध्यें बरें वाईटांचें मिश्रण असतें आणि जणु बरें आणि वाईट यांनीं एकमेकांस तोलून धरलेलें असतें अशा व्यक्तींचीच आपली जीवनांत गांठ पडते. अशा स्थितींत कोणाहि व्यक्तीशीं, तुमचे बरे व वाईट दोन्ही प्रकारचे संबंध एकाच वेळीं राहूं शकतात. शिवाय तुम्ही स्वतःहि बऱ्या-वाईटांचें मिश्रणच असतां आणि समान धर्मियांचीच सामान्यतः भेट होत असते असा नियम आहे. त्यामुळें तुम्हाला भेटलेल्या एकाद्याबद्दल तुम्हाला अगदींच तिरस्कार वाटण्याचें काय कारण आहे?

असें सांगतात कीं, कांहीं माणसें एकाद्या रक्तपिपासु प्राण्याच्या स्वभावासारखीं असतात. कोणाहि माणसाशीं संबंध येतांच एकाएकीं त्यांची शक्ति व उत्साह तीं शोषून घेतात व शेवटीं त्याला निःसत्व करून सोडतात. अशा व्यक्तींना भयानक धोका समजून त्यांच्यापासून अगदीं दूर राहिलें पाहिजे. अशा व्यक्ती अस्तित्वांत असतात हें खरें असलें तरी त्याहि क्वचितच असतात हेंहि तितकेंच खरें आहे. शिवाय अशा व्यक्तीसुद्धां सर्वस्वींच दुष्ट नसतात. त्यामुळें त्यांची गांठ पडली कीं भेदरून जाऊन तेथून पळून जाण्याची कांहीं गरज नाहीं.

सारांश, तुम्हांला जर आध्यात्मिक दृष्टचा प्रगति करून घ्यावयाची असेल तर तुम्हीं तिरस्कार आणि द्वेषभावना ओलांडली पाहिजे, आणि त्याबरोबरच अतीव आकर्षणाची व अतीव सहानुभूतीचीहि भावना ओलांडली पाहिजे. या सर्वच गोष्टींकडे स्मित वदनानें तुम्हाला पहाता आलें पाहिजे.

# ‘यू नो’ व ‘जागतिक राज्य’ निर्मिति

.....दोन महायुद्धें आलीं व गेलीं. राष्ट्राराष्ट्रांत ऐक्य नांदावें म्हणून व त्याचें सुयोग्य साधन व्हावें म्हणून एक व्यावहारिक संघटना निर्माण करण्याचे दोन्हीं वेळां जे विशेष प्रयत्न झाले, ते मात्र बंद पडले नाहींत. पहिल्या महायुद्धाचा अंगभूत परिणाम म्हणून राष्ट्रसंघाची (लीग ऑफ नेशन्स) स्थापना झाली त्याचप्रमाणें दुसऱ्या जागतिक झगडयांतून यू. एन्. ओ ची निर्मिति झाली. कांहीं लोकांच्या मतें––पुष्कळांच्या नव्हे––तिसरें महायुद्ध अटळ आहे. तें जर झालें तर त्या प्रयत्नांचें आणखी एक पाऊल पुढें पडेल आणि ऐक्य व शांतता यांकरितां जें जागतिक प्रयत्न चालू आहेत त्यांतून एकादी निश्चित घटना तयारहि होईल. प्रकृति अशा तऱ्हेचीं साधनें वापरते. आपलें ध्येय सफल व्हावें म्हणून त्या ध्येयाला विरोधी स्वरूपाची व विधातक अशी घटनाहि ती घडवून आणते. मानवी स्वभावाची आध्यात्मिक परिपूर्णता व सफलता साध्य करण्याच्या मार्गांत ज्या ज्या गोष्टी आड येतात, ज्या ज्या सुप्त मानसिक प्रवृत्ती पुढें कार्याच्या नाशास कारण होण्याचा संभव असतो, त्या त्या प्रकृतींतून नाहींशा करण्याकरितां ज्याप्रमाणें योगाभ्यास किंवा अध्यात्मसाधना करतांना त्या जागृत होतात त्याचप्रमाणें याही बाबतींत प्रकृतीचें कार्य याच पद्धतीनें चालतें. तिच्या मार्गांतील जागतिक शक्तींपैकीं ज्या तिच्या हेतूला साह्यकारी होतील अशांनाच ती आवाहन करते असें नव्हे तर ज्या शक्ती तिच्या गुप्त मूळ हेतूला स्वाभाविकच विरोधी ठरतील त्यांना, आणि ज्या तिच्या कार्यांत विघ्न आणल्याशिवाय रहाणारच नाहींत, अशा शक्तींनाहि त्यांचा नाश करण्याकरितां ती जागृत करते. मानवेतिहासांत अशा गोष्टी वारंवार घडलेल्या दिसतात. जें कार्य करणें आवश्यक आहे, त्या कार्याच्या भव्यतेच्या, प्रचंडतेच्या मानानें उलट बाजूच्याहि कितीतरी विरोधक शक्ती निर्माण झाल्याचीं उदाहरणें आज आपण पाहतो. पण प्रकृति आणि तिचा विधाता यांच्या उद्दिष्टाला त्यांच्याकडून जितका अडथळा झाल्याचें आपणांस दिसतें त्यापेक्षां अखेरीस त्यांच्याकडून मूळ हेतूला मदतच अधिक झालेली दिसते.

आतांपर्यंत ज्या गोष्टी घडून आल्या आहेत व भविष्यकाळांत यापुढें ज्या गोष्टी साधूं शकतील असें दिसतें, त्या संबंधीं आपण आशावादी रहावें हें इष्ट होय. पण या आशावादामुळें, पुढें दिलेल्या घटनेबाबत आपण आंधळेपणानें वागावें असें नाहीं.––अनिष्ट अशी परिस्थिति निर्माण होईल, विनाशकारी प्रवृत्ति निर्माण होईल, कार्यासहि मोठा अडथळा उत्पन्न होण्याचा संभव आहे. अशा कांहीं गोष्टी मानवी जगांत घडून येतील कीं, ज्यायोगानें झालेलें काम उलटें पालटें होऊन जाईल,––या साऱ्या घटनांकडे दुर्लक्ष होतां कामा नये. आजची प्रत्यक्ष परिस्थिति पाहिली तर ‘युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन’ मध्यें पुष्कळच उणीवा आहेत. तिच्या हातून पुष्कळ घोडचुका झाल्या आहेत, आणि तिच्या अस्तित्वावरच गदा येईल अशा रोगांचीं बीजें तिच्यांत आहेत हें कबूल केलें पाहिजे. यामुळें पुष्कळ लोकांच्या मनांत त्या संस्थेबद्दल असमाधान आहे व कांहींना निराशा वाटते आणि तिच्या अंतिम यशाच्या शक्यतेबद्दलहि शंका वाटते. हा निराशावाद शहाणपणाचा अगर जरूरीचा आहे असें नाहीं. कारण एकदां

निराशावाद वाटूं लागला म्हणजे ज्या संकटांची आंतून अपेक्षा वाटते तीं संकटें प्रत्यक्षच येऊन कोसळतात. वास्तविक तीं येण्याची जरूरीहि नसते. संकटें आहेत व येऊं शकतील ही गोष्ट मात्र दृष्टिआड करणें इष्ट नाहीं. यश मिळविण्यास आवश्यक असलेली इच्छाशक्ति, राष्ट्रांत ज्या पुढाऱ्यांच्या ठिकाणीं आहे व अपयश आलें तर ज्यांना पुढील पिढी दोष देणार आहे, त्यांनीं, चुकीचीं राजकीय धोरणें स्वीकारलीं जाऊं नयेत व परिणामीं घातक ठरणाऱ्या चुका होऊं नयेत म्हणून, मोठी काळजी घेतली पाहिजे व मोठी सावधानता ठेवली पाहिजे. त्या संघटनेंत किंवा तिच्या व्यवस्थेंत जे दोष असतील ते शक्य तितक्या लवकर दुरुस्त केले पाहिजेत; व हळुहळु सावधगिरीनें ते काढून टाकले पाहिजेत. कोणी हटवादीपणानें, जरूर ते बदल करू देत नसेल अगर विरोध होत असेल तर तो विरोध नष्ट केला पाहिजे किंवा टाळला पाहिजे. संस्थेला मात्र धक्का लागतां कामा नये. संस्थेची घटना पूर्णत्वास नेण्यासाठीं जी प्रगति अवश्य आहे ती ताबडतोब किंवा सौकर्यानें घडून येण्यासारखी नसली तरी तिचा प्रारंभ करावयास पाहिजे आणि आज जगाला जी आशा वाटत आहे ती विफल होऊं न देण्याची काळजी घेतली पाहिजे. आजतरी मनुष्यजातीला दुसरी उपाययोजना सुचत नाहीं. ईश्वरानेंच यापेक्षां अधिक प्रभावी व सोपा मार्ग दाखविला तर गोष्ट वेगळी. मनुष्यस्वभावांत कांहीं मोठा फरक झाला, त्याचप्रमाणें मानवाच्या इच्छा-संकल्पांत फरक झाला किंवा एकाएकीं उत्क्रांतिरूपानें प्रगति झाली तर गोष्ट वेगळी. पण अशा रीतीनें मनुष्यजातीचें भवितव्य घडविण्याचा निराळा व अधिक सोपा उपाय ज्यायोगें सांपडेल, अशी उत्क्रांतिक्रमांतील एक पुढची पायरी, उडी मारून एकाएकीं, गांठली जाईल कीं नाहीं हें आज तरी सहज सांगतां येणें कठीण आहे.........

अशा अवस्थेमध्यें सुद्धां प्रकृतीच्या कार्याचा हेतू एकच राहणार; तो हा कीं, प्रकृतीनेंच निर्माण केलेले अडथळे प्रकृतीच दूर करील व कदाचित् ते कायमचेहि दूर केले जातील. भविष्य काळांत अशी जर परिस्थिति यावयाची असेल तर शेवटीं कां होईना एक 'जागतिक राष्ट्र' (World State) निर्माण करावें लागेल. त्यांत सर्वांचा समावेश करावा लागेल व कोणत्याहि राष्ट्राचें सामर्थ्य अगर विस्तार यांचा विचार न करतां सर्व राष्ट्रांना बरोबरीचे हक्क द्यावे लागतील. जगांतील सर्व राष्ट्रांत सुव्यवस्था व एकमेकांमध्यें सुसंवाद राखण्याकरितां आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा कायदा केला जाईल. त्यायोगें प्रत्येक राष्ट्र आपापल्या सामर्थ्यानुसार या कार्याकरितां आपलें वजन खर्च करण्यास मोकळें राहील. या मोठ्या संस्थेची पायाभूत तत्त्वें किंवा या जागतिक राष्ट्राचा दंडक जो असेल तो पुढील स्वरूपांत दिसेल—सर्वांना खात्रीनें न्याय मिळेल; मूलभूत बरोबरीचा हक्क मिळेल आणि सर्वांचीं सुखदु:खें, हक्क व हितसंबंध यांच्या संरक्षणाची हमी दिली जाईल.

जागतिक ऐक्याच्या ध्येयाच्या मार्गावर जी प्रगति चालूं आहे तिच्या या दुसऱ्या पर्वांत जें खरें संकट आहे तें युनायटेड नेशन्स असेंब्लिच्या व्यवस्थेंत कितीहि दोष असले तरी त्यांत नाहीं. परंतु राष्ट्रांचे जे दोन कंपू, गट, पडले आहेत, त्यामध्यें तें संकट आहे. कारण हे कंपू कोणत्या क्षणीं परस्परविरोधी बनतील व एकमेकांचें उघड शत्रुत्व करूं लागतील याचा नेम नाहीं. त्यांचें एकत्र राहणें कदाचित् अशक्य होईल. असें होण्याचें कारण कीं, बोल्शेविक रशियाचा जो कम्युनिझम—साम्यवाद आहे त्याचा जन्म पाहिला असतां तो भराभर उत्क्रांति

होऊन निर्माण झाला नाहीं. अपूर्व अशा भयंकर व रक्तलांछित आणि दीर्घकाळ चाललेल्या क्रांतींतून त्या साम्यवादाचा जन्म झाला आहे. वर्गावर्गांमधील युद्धाच्या पायावर एक सुलतानशाही व अरेरावी राष्ट्रपद्धति त्यांत निर्माण झाली. कामगार वर्गाशिवाय (प्रोलेटरियट) इतर वर्ग त्यांत नाश पावले. कामगार वर्गाची सत्ता स्थापन होऊन त्याच्या नांवावर एका महान् सामर्थ्यवान् पक्षाची सत्ता स्थापन झाली. ते पोलीस राज्य होतें, व सर्व जगाशीं त्याचा नैतिक पातळीवर झगडा चालू झाला होता. ज्यांनीं हें नवें राष्ट्र निर्माण केले त्यांच्या मनांत या भयानक झगड्यामुळें असा विचार उत्पन्न झाला कीं आपलें राष्ट्र आपण जगविलें पाहिजे, इतकेंच नव्हे तर आपल्या तत्त्वांची पक्कड इतर राष्ट्रांवरहि बसविली पाहिजे. नवीन व्यवस्था उत्पन्न होऊन जुनी नष्ट होईपर्यंत हा झगडा चालला पाहिजे. अखिल जगावर नसला तरी जगाच्या मोठ्या भागावर या नव्या राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञानाचा पगडा बसला पाहिजे किंवा जगांतील लोकांनीं ते मान्य केलें पाहिजे असा त्यांचा संकल्प होता. परंतु कदाचित् यांत बदल होईल, नव्हे कांहीं प्रमाणांत तसें दिसतहि आहे. झगड्याची पहिली लाट ओसरून एक प्रकारची कांहींशीं सुरक्षितता निर्माण झाल्यावर पहिली मत्सरभावना, कडवटपणा व तीव्रता उरलेली नाहीं. यापुढें नव्या व्यवस्थेंत जुलूमशाहीची धार कमी होईल व एकत्र किंवा शेजारीं-शेजारीं दोन निरनिराळ्या ध्येयवादानें प्रेरित झालेलीं राष्ट्रें राहूंच शकत नाहींत ही कल्पना नाहींशीं होऊन अधिक खात्रीचा व एक नवीनच मार्ग अंमलांत येणें शक्य होईल. दोन ध्येयवादित्वांमधील जो लढा आहे त्याचा उपयोग करून जगावर आपलें राज्य चालवावें या कल्पनेमुळें आज एकमेकांमध्यें सलोखा व नवी अर्थव्यवस्था निर्माण होत नाहीं व युद्ध अटळ आहे अशी कल्पना निर्माण होते. यामुळें राष्ट्रांचे दोनहि गट एकमेकांस भिऊन वागत आहेत व आपली संरक्षणाची व चढाईची तयारी करीत आहेत. हे दोनही गट एकत्र राहूं शकतील ही गोष्ट अशक्य आहे, म्हणून हें वैर उत्पन्न झालें आहे असें मात्र नव्हे. जगावर राज्य करावें ही कल्पना जर नष्ट झाली तर हे दोन राष्ट्रांचे गट अधिक जवळ येऊं शकतील, एकत्र राहूं शकतील, आर्थिक व्यवहारांत परस्पर देवाण-घेवाण करतील याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. कारण जनसमूहाच्या जीवनावर राष्ट्रांचा ताबा असावा या तत्त्वाचा विकास जगांत होत आहे. ज्यामध्यें समाजवादी राष्ट्रांचे गट शेजारी शेजारी नांदूं शकतील आणि एकमेकांकडे स्नेहदृष्टीनेंहि पाहूं शकतील, ज्यामध्यें हे दोन गट आपल्या संस्थांचें अस्तित्व टिकवूं शकतील व एकाच लोकसभेंत बसून काम करूं शकतील अशातऱ्हेचें एक 'जागतिक राष्ट्र' निर्माण होणें शक्य आहे. व अशातऱ्हेनें जागतिक ऐक्य प्रस्थापित करणें अशक्य नाहीं. अशातऱ्हेचें 'जागतिक राष्ट्र' निर्माण होणें शक्य आहे या कल्पनेवरच 'यू. नो' चा पाया घातला गेला. कारण सध्यांची संघटना ही अंतिम स्वरूपाची नाहीं. हा एक लहानसा अपूर्ण स्वरूपाचा प्रारंभ आहे. जी मोठी संस्था स्थापन होणें जरूर आहे त्याचें हें एक प्रारंभिक केंद्र आहे. पृथ्वीवरील सर्व राष्ट्रें एकाच आंतरराष्ट्रीय संस्थेंत सामील होतील, या ध्येयाचा हा पहिला हप्ता आहे. अशातऱ्हेच्या प्रयत्नांचा 'जागतिक राज्य' निर्माण करणें हा एकच तर्कशास्त्रदृष्ट्या अटळ असा परिणाम आहे यांत शंका नाहीं.

अशा तऱ्हेचें भविष्यकाळचें चित्र सध्यांचे परिस्थितींत रंगविलें तर हा फसवा आशावाद आहे अशी त्याला नांवें ठेवलीं जातील. परंतु निराशावादी लोकांच्या आपेक्षेप्रमाणें विनाश

होणें जसें शक्य आहे तसें आशावादी लोकांच्या आपेक्षेप्रमाणेंहि घडणें तितकेंच शक्य आहे. नवें महायुद्ध झालें तर त्याचा परिणाम सध्यांची संस्कृति नष्ट होण्याकडेच होईल असे जे ते भविष्य करतात तें खरें होईलच असें नाहीं. सृष्टीमध्यें भयानक उलथापालथ होते. तिनें निर्माण केलेल्या महासंकटांतून मनुष्यजात बचावली आहे व मनुष्यजातीच्या अस्तित्वाला कांहीं अर्थ असेल तर असें घडणारच. मनुष्यजातीच्या दीर्घ इतिहासांत ती जी टिकून राहिली ती कांहीं दैवानें हात दिला म्हणून नव्हे. जगाचा भौतिक दृष्टीनें विचार केला तर तसें कदाचित् म्हणतां येईल. या विश्वांत जी उत्क्रांति चालू आहे व जिचा शेवट सध्या तरी मनुष्यजातीच्या निर्मितींत झाला आहे ती जर टिकावयाची असेल, व तिचें नेतृत्व कांहीं प्रमाणांत, त्याची अस्पष्ट जाणीव असलेल्या मानवानें करावयाचें असेल तर आंतरराष्ट्रीय अंदाधुंदींतून मनुष्यजात सुरक्षित बाहेर पडलीच पाहिजे. मनुष्य जातीनें संघटित होऊन सामुदायिक प्रयत्नांस सुरुवात केली पाहिजे; म्हणजेच शेवटीं एक जागतिक राष्ट्र निर्माण झालें पाहिजे, मग तें एकसत्ताक (Unitary) किंवा राष्ट्र स्वायत्ततेच्या स्वरूपाचें किंवा राष्ट्रमंडळाच्या स्वामित्वाखालचें किंवा सर्वांच्या मतास अनुसरून चाललेलें, कसेंहि असो.

—श्रीअरविंद

('आयडियल ऑफ ह्यूमन युनिटी या ग्रंथाच्या अखेरच्या प्रकरणांतील अंशभाग. लेखन-काल सन १९५०) SABCL Vol 15 : Page 557

---

# साधकांना पत्रें

## वाक्-संयम

वाक्-संयम हा भौतिक परिवर्तनासाठीं अत्यंत आवश्यक आहे.

१७-६-३४

*

तुझे बरोबर आहे—योग्य कृति आणि आंतरिक साधना या दोन्हीं साठींहि मितभाषण हें साहाय्यक ठरतें. १८-३-३६

*

दीर्घकाळपर्यंत ज्या गोष्टी संवयींच्या झालेल्या असतात त्या एकदम बदलतां येत नाहींत हें तर उघडच आहे. विशेषतः बोलणें ही बाब अशी आहे कीं, अनेक लोकांच्या ठिकाणीं ती यांत्रिक होऊन बसलेली असते आणि तिच्यावर त्यांचा संयम असत नाहीं. सतत दक्ष रहाण्याची संवय झाली तर संयम साधतो. म्हणून आपल्या बोलण्यापासून काय अपाय होतात त्याविषयीं साधकानें अतिशय सावध राहिलें पाहिजे. जागरुकपणा ढिला होऊं देतां

कामां नये. मात्र ही दक्षता जितकी स्थिर, अमिश्रित व निश्चित असेल तितकी चांगली. दक्षतेऐवजीं उगीच धाकधुग वाटत रहाणें असें होतां कामां नये.

.....तुला सतत प्रयत्न केला पाहिजे आणि संयम राखण्याची संवयच जडवून घेतली पाहिजे—नेहमीं आपल्या बोलण्यावर संयम राखण्यांत तूं यशस्वी झालास—अर्थात् त्याला सतत जागरुकतेची जरूरी लागते—तर तुला शेवटी असें आढळेल कीं संयम आपोआप रहात आहे आणि दीर्घकाळानंतर असें दिसेल कीं, हा संयम नेहमींच साह्यभूत होत आहे.

जोपर्यंत या बाबतींत मातृशक्तीचा प्रकाश आणि सामर्थ्य स्वीकारण्यास आपण संपूर्ण उन्मुख झालों नाहीं तोपर्यंत वाक्-संयमाविषयीं जागरुकता बाळगली पाहिजे. एकदां ही गोष्ट साधली तर त्वरित् आणि कांहीं वेळां अत्यंत द्रुतगतीनें हा संयम साध्य होईल. अंतःपुरुष (Psychic) हाहि या कामीं आपल्या मदतीस धांवून येतो; मध्यस्थी करूं शकतो. ज्या ज्या वेळीं तुम्ही एकदम विचार न करतां कसेंहि बोलूं लागणार इतक्यांत जर मध्यें पडून "नाहीं" असें तुमचा आंतरात्मा म्हणाला, इतकी पुरेशी जागृति जर आंतरात्म्यामध्यें झाली, तर हा संयम, हा बदल अधिक सुलभ होतो. ११-१०-३८

CWSA : Letters Of Sri Aurobindo :
Transformation Of The Physical Being

*

# टीका करण्याची संवय

टीका करण्याची, विशेषतः, माहित नसतांना दुसऱ्याविषयीं टीका करण्याची प्रवृत्ति म्हणजे संबंध जगालाच जडलेल्या रोगांपैकीं एक रोग आहे. सर्व प्रकारच्या कल्पना, तर्कवितर्क, अतिशयोक्ती, विपरीत ग्रह आणि नसत्याच गोष्टी शोधून काढण्याची अजब खोड या सर्व गोष्टी अशा टीकेमध्यें असतात. आपल्यामधील प्राणतत्त्वाचा, वासनात्मक पुरुषाचा हा एक रोग आहे. या रुक्ष आणि अपायकारक विषयामध्यें वासनामय प्राणाला एक प्रकारचा आनंद मिळत असतो, आणि त्याचें एक साधन म्हणून जड भौतिक सामान्य मन हेंहि वासनामय प्राणतत्त्वाला दुजोरा देतें. बाह्य जीवन बदलण्याच्या दृष्टीनें आंतरिक अनुभवांचा जर कांहीं चिर परिणाम व्हावयाचा असेल तर वाक्-संयम, ह्या वर सांगितलेल्या रोगाचा त्याग आणि वासनांचा समूळ नायनाट ह्या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत.

*

दुसऱ्या संबंधीं न बोलणें किंवा सामान्य बुद्धीनें टीका न करण्याचा कटाक्ष असणें फार चांगलें. त्यासाठीं खालील गोष्टींची आवश्यकता आहे. वस्तू आणि घटना यांजकडे पहाणारी सूक्ष्म आणि खोल दृष्टि व सारग्राही जाणीव वाढविली पाहिजे. त्यामुळें आपल्यामधील व दुसऱ्यांमधील प्रकृतीच्या हालचाली, क्रिया आंतरिक शांततेमध्यें जाणन घेतां येतात आणि आपली जाणीव विचलित होत नाहीं, प्रक्षुब्ध होत नाहीं, वरवरच्या गोष्टींमध्यें तिला गोडी वाटत नाहीं आणि बाह्य हालचालींमध्यें ती गुरफटून जात नाहीं. २६-८-३३

*

या आश्रमांतील साधक कांहीं पूर्णत्व पावलेलें आहेत असें नाहीं—त्यांच्यांतहि पुष्कळ उणीवा आणि अयोग्य प्रवृत्ती आहेत. त्या दिसूं शकत नसतील तर तो एक प्रकारचा आंधळेपणा आहे; समजा, दोष दिसले तरी त्यामुळें टीका करण्याची व त्यांचा तिरस्कार करण्याची तुमची वृत्ति होऊं नये. ज्या दुष्प्रवृत्ति जिंकावयाच्या आहेत त्यांचा या साधकांचे ठिकाणीं खेळ चालला आहे असें मानलें पाहिजे.

—१९३३

★

## वादविवाद

विरोधी लोकांशीं किंवा अश्रद्ध माणसांशीं माझ्यासंबंधीं, आश्रमासंबंधीं किंवा आध्यात्मिक गोष्टींसंबंधीं चर्चा करणें हें तितकेसें योग्य नाहीं. अशा वादविवादानें किंवा चर्चेनें सामान्यतः नेहमीं साधकाच्या भोंवतीं विरोधी वातावरण निर्माण होतें आणि तें त्याच्या प्रगतीला कधींच साहाय्यक असूं शकत नाहीं. अलिप्त रहाणें ही सर्वांत उत्तम भूमिका. दुसऱ्या लोकांची वाईट इच्छा किंवा त्यांचें अज्ञान नाहींसें करण्याच्या बाबतींत मन घालण्याची साधकास कांहीं जरूर नाहीं.

१३-९-३२

★

—अशा तऱ्हेचे वादविवाद करणें अगदीं व्यर्थ आहे. त्यानें फक्त, मन गढूळ होतें आणि खोटेपणाकडे नेणारें द्वार खुलें होतें.

★

## स्वतःच्या अनुभवांविषयीं बोलणें

दुसऱ्यांना आपले अनुभव सांगणें हें सामान्यतः योग्य नाहीं. त्यामुळें त्या अनुभवांतील सामर्थ्य कमी होतें आणि सांगणाराच्या जाणीवेची पातळीहि खालावते.

९-११-३३

★

साधना आणि साधनेंतील अनुभव यांविषयीं दुसऱ्यांशीं फारशी चर्चा करणें चांगलें नाहीं. या नियमालाहि अपवाद असले तरी ती ती व्यक्ति आणि परिस्थिति यांवर तें अवलंबून राहील.

★

.......आपले स्वतःचे किंवा दुसऱ्याचे अनुभव जर आपणांस कळले तर त्याविषयीं बोलबोला करूं नये, किंवा तो गप्पांचा विषय होऊं नये. त्यांपासून दुसऱ्या व्यक्तींना आध्यात्मिक दृष्टचा कांहीं लाभ होणार असेल व ते अनुभव भूतकाळांत घडून गेलेले असतील तरच फक्त ते अनुभव बोललें तर चालेल. नाहींतर ॲबिसिनिया, स्पेन वगैरे देशांसंबंधींच्या वृत्तपत्रांतील बातम्याप्रमाणें त्याला स्वरूप येतें, वखवखलेल्या जनमनाला चणेफुटाण्यांसारखी कांहींतरी सामान्य आणि क्षुल्लक गोष्ट चघळायला किंवा तोंडीं लावयला दिल्यासारखें तें होतें.
१८-९-३६

——श्रीअरविंद

(पत्रसंग्रह खंड ४ मधून)

CWSA : Letters Of Sri Aurobindo : Page 580

# श्रीअरविन्द वाङ्मय

( प्रास्ताविक )

श्रीअरविंदांच्या बहुप्रसवा लेखणीच्या अफाट क्षेत्राची बरोबरी त्या लेखणींतून वाहणाऱ्या ज्ञानगंगेची उदात्तताच केवळ करूं शकेल. वयाच्या अकराव्या वर्षीं त्यांनीं आपली पहिली कविता लिहिली; आणि प्रकाश-मन (Mind of Light) हा शेवटचा लेख लिहिला ७८ व्या वर्षीं. या देव-मानवाच्या किमयाकारी स्पर्शानें पुनीत झालेले विषय विविध आहेत. कला, काव्य, टीका, धर्म, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, इतिहास, योग——हे सर्वच विषय हाताळतांना लाभलेली समीक्षणाची गाढता आणि दृष्टिकोनाची विशालता यांमुळें या सर्वच विषयांना पायाभूत असें एकच समान उद्दिष्ट आहे ही गोष्ट स्पष्टपणें प्रतीत होते. लेखन प्रारंभीचें असो किंवा नंतरचें असो, किंवा विषय कोणताहि असो, मानवाच्या पूर्णतेचा आदर्श आणि पृथ्वीवरील दिव्य जीवनाचा मंत्र हाच त्यांच्या लेखनाचा आत्मा आहे. प्रारंभींच्या वाङ्मयीन कृतींपैकीं रोमांचकारी नाट्य–विषय असो किंवा अल्पकालच चमकून गेलेल्या त्यांच्या राजकीय जीवनकालांतील त्यांचीं जळजळीत भाषणें आणि झणझणीत संपादकीय लेख असोत किंवा त्यांच्या जीवनदृष्टीमागील तत्त्वज्ञानाचें प्रतिपादन असो, मानवामधील दिव्य संभाव्यता हाच त्या सर्व लेखनाचा प्रधान-स्वर आहे.

खरोखर याहून दुसरा स्वर तरी असणार कसा ? कारण, मानवजातीला एक नव-जीवन, दिव्य जीवन जगण्याची शक्यता आहे, नव्हे, प्रकृतीच्या सर्व यत्नांचा तो एक अनिवार्य परिपाक आहे——या सत्याचें मानवास दर्शन घडावें म्हणून तर त्यांनीं या पृथ्वीवर जन्म घेतला होता; आणि याच ध्येयपूर्तीसाठीं आपल्या आयुष्याचा अधिकांश त्यांनीं वेंचला. युगानुयुगें परिश्रम करून उत्क्रांतीच्या मार्गानें हें ध्येय प्रकृति साध्य करूं पहात आहे. त्या ऐवजीं, ज्यामुळें पृथ्वीवर एक नवीन चेतना आविर्भूत होऊन येथें नवीन जीवन रसरसेल आणि ज्यामुळें मूळ स्वभावांतच आमूलाग्र बदल होऊन अज्ञान, अक्षमता आणि मृत्यू यांच्या कचाट्यांतून मानवजीवन मुक्त होऊन तें दिव्य ज्ञान, दिव्य सामर्थ्य व अमरत्व यांमध्यें प्रविष्ट होईल

अशा क्रांतिकारी शीघ्रगामी प्रभावी योग-प्रक्रियेनें हें सर्व घडवून आणण्याचा प्रयत्न श्रीअरविंदांनीं केला.

दिव्य-जीवन (Life Divine) या आपल्या प्रमाणभूत ग्रंथांत श्रीअरविंदांनीं याच विषयाचें सांगोपांग विवरण व त्याच्या तात्त्विक शाखोपशाखांचें प्रतिपादन केलेलें आहे. त्यांतील सिद्धांत आचरणांत उतरविण्याचीं साधनें आणि कोणत्याहि तात्विक, सिद्धांतास जिवंत मूर्त स्वरूप देणारे अनुभव यांचा सविस्तर उहापोह त्यांनीं आपल्या दुसऱ्या 'योगसमन्वय' (Synthesis of Yoga) या महान् ग्रंथांत केला आहे. मानवांतील आत्म-पूर्तीची ही ऊर्मि समाजाचा विकास होत असतांना कशी प्रतिबिंबित होत असते आणि आत्मपूर्तीचें, आत्मसिद्धीचें हें ध्येय सामूहिक रीतीनें कसें कार्यकारी करतां येईल, समाजजीवनांतहि त्यास कशाप्रकारें मूर्त स्वरूप देतां येईल ह्याचें दिग्दर्शन 'मानव-समाज-विकासाचें चक्र' (Human Cycle) या ग्रंथांत त्यांनीं केलें आहे. भूगोलावर इतस्ततः विखुरलेले विविध मानववंश, आपल्या आंतरिक एकत्वाची सिद्धी बाह्य जीवनांतहि करण्याच्या ध्येयाकडे, मंद गतीनें पण निश्चितपणें कसे जात आहेत याची रूपरेखा व त्याच बरोबर, या एकत्व सिद्धीमध्यें व्यत्यय आणून ती लांबणीवर लोटणाऱ्या संकटांचें व अडथळयांचेंहि विश्लेषण करून त्यांतून मुक्त होण्याचे मार्ग व नानाविध समस्यांची उकल करण्याची दिशाहि त्यांनीं 'मानवी ऐक्याचें ध्येय' (The Ideal of Human Unity) या ग्रंथांत दाखविली आहे.

आपल्या अनुभवास आलेलें हें ज्ञान भारताच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक महान् परंपरेशीं कसें जुळणारें आहे हें दाखविण्याच्या उद्देशानें श्रीअरविंदांनीं भारताचे प्राचीन धर्मग्रंथ, शास्त्रग्रंथ हातीं घेतले. ऋग्वेदाच्या ऋचांच्या गाभ्यासच सरळ हात घालून त्यामधील गूढ विचारधन त्यांनीं स्पष्टपणें प्रकाशांत आणलें आहे. या अतिसंपन्न सूक्तकालीन ऋषींनीं स्वतःच्या आत्मोन्नतिसाठीं व आत्मोत्कर्षासाठीं केलेल्या आंतरिक साधनेची सर्वत्र विखुरलेलीं सूत्रें त्यांनीं पद्धतशीरपणानें एकत्र ग्रथित केली आहेत. या विषयींचे त्यांचे सिद्धांत त्यांनी 'वेदरहस्य' (Secret of the Vedas) या लेखमालेंत व 'वेदाविषयीं' (on the Veda) आणि 'अग्निसूक्तें' (Hymns to the Mystic Fire) या नांवानें आतां प्रसिद्ध झालेल्या ग्रंथामधील अनेक ऋचांच्या अनुवादांत व त्यावरील टीकेमध्यें मांडले आहेत.

तसेंच उपनिषदांच्या बाबतींतहि. ईश आणि केन[१] या उपनिषदांच्या अनुवादांत त्यांतील विचार-सूत्रांचें अधिक विस्तृत विवरण त्यांनीं केलें आहे. आणि 'हें अखिल जगत् म्हणजे सर्वव्यापी व ज्ञान-शक्ति-आनंदरूप ब्रह्माचा हेतुपूर्ण आविष्कार आहे', ह्या त्यांतील सर्वसमन्वयात्मक तत्त्वविचाराकडे लक्ष वेधलें आहे. शिवाय, कठ, प्रश्न, तैत्तिरीय, ऐतरेय, मुंडक आणि मांडूक्य यांचा मोकळा अनुवाद[२] त्यांनी केला असून तैत्तिरीय,[३] छांदोग्य[४] आणि बृहदारण्यक[५] या उपनिषदांतील प्रमुख विचारसूत्रांवर गूढार्थबोधक टीपा लिहिल्या आहेत.

समन्वयप्रधान भारतीय बुद्धिमत्तेचा परमोच्च बिंदू ज्यामध्यें दिसून येतो असा गीता हा

---

[१] Isha Upanishad, Kena Upanishad. [२] Eight Upanishads.
[३] Arya, Nov. 1918. vol. V. [४] Advent, August 1953.
[५] Pathamandir Annual No. 12, 1953.

ग्रंथ यानंतर श्रीअरविंदांनीं घेतलेला आहे. आंतरिक आत्मज्ञानाचा, आत्मोपलब्धीचा उपयोग बाह्य व्यवहारांत, प्रत्यक्ष कर्मामध्यें, जीवनाचा दैवी विकास साधण्यासाठीं कसा करावा याविषयींच्या गीतोक्त मार्गाचें सांगोपांग व मनाचा संशय फेडणारें विवेचन त्यांनीं केलें आहे. श्रीअरविंदांच्या वाङमयापैकीं हे तेजस्वी 'गीतेवरील निबंध' (Essays on the Gita) वाचलेला वाचकवर्ग फार मोठा आहे.

एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, हें सर्व लेखन करीत असतांना कोणत्याहि उपलब्ध टीकाग्रंथावर किंवा भाष्य ग्रंथावर अवलंबून राहून या प्राचीन ग्रंथांतील आशय अथवा त्यांतील सारभूत सिद्धांत त्यांनीं मांडलेले नाहींत. त्यांचा दृष्टिकोन सरळ सरळ आणि प्रांजळ मनाचा आहे आणि त्यांनीं काढलेले निष्कर्ष हेहि मूळ ग्रंथांतर्गत व तदनुषंगिक पुराव्यांच्या प्रत्यक्ष कसोटीस नंतर उतरलेले दिसून आले आहेत.

या प्रमुख ग्रंथरचनेबरोबरच श्रीअरविंदांनीं इंग्रजीमध्यें विपुल काव्यरचना केलेली असून 'सावित्री–कथा आणि प्रतीक' ( Savitri : A Legend and a Symbol ) हें काव्य म्हणजे त्याचा कळस आहे. अखिल मानवतेच्या आध्यात्मिक क्षेत्रांतील साहसी प्रवासाचें, त्याच्या मार्गाचें व विस्ताराचें चित्रण त्यांनीं त्यांत केलें आहे. मर्त्य जीवनाचें अमर काव्यामध्यें रूपांतर करण्याचें आपलें स्वतःचें जीवितकार्य पार पाडण्यासाठीं कराव्या लागलेल्या साहसांना व त्यामध्यें संपादन झालेल्या सिद्धींना श्रीअरविंदांनीं या काव्यद्वारां मूर्तरूप दिलें आहे. त्याचें आणि श्रीअरविंदांच्या प्रमुख ग्रंथांचें विवेचन आम्ही अन्यत्र केलें आहे. शिवाय हा एक फारच मोठा आणि स्वतंत्र विषय असून आमच्या प्रस्तुतच्या कक्षेबाहेरचा तो आहे. श्रीअरविंदांचे या खेरीजहि अनेक लहान ग्रंथ उपलब्ध आहेत. ते आकारानें लहान असले तरी त्यामुळें त्यांचें मूल्य मात्र यत्किंचितहि कमी नाहीं. त्यापैकीं कांहीं ग्रंथांचा विशेषतः श्रीअरविंदांच्या उपदेशानुसार साधना करण्याचें दृष्टीनें महत्त्वाच्या अशा ग्रंथांचा परिचय वाचकांना करून देण्याच्या उद्देशानें ही लेखमाला सुरु केली आहे.

अर्थातच, अशा तऱ्हेच्या ग्रंथामध्यें 'माता' (The Mother) या पुस्तकाचा क्रमांक पहिला लागेल.

(अपूर्ण)

—मा. पुं. पंडित

# अडचणींमध्यें असतांना

ध्यान करीत असतांना नाना प्रकारचे विचार येतात, ही अडचण विरोधी शक्तींमुळें निर्माण होत नाहीं, तर मानवी मनाचा साधारण स्वभावच त्यास कारणीभूत असतो. सर्वच साधकांना ही अडचण येते; आणि कांहींच्या बाबतींत तर ही अडचण अति दीर्घकालपर्यंत टिकते. तींतून मुक्त होण्याचे अनेक मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे मनांत प्रविष्ट होत असलेल्या विचारांकडे पहात रहावयाचें आणि त्यावरून मानवी मनाचा कोणता भाग व्यक्त होत आहे याचें निरीक्षण करावयाचें. मात्र हें करतांना त्यांना कोणत्याहि प्रकारें संमति दाखवावयाची नाहीं. हळुहळु ते हतबल होऊन स्वस्थ पडून राहीपर्यंत त्यांना धावपळ करूं द्यावयाची–– ही पद्धत स्वामी विवेकानंदांनीं आपल्या राजयोगांत सांगितली आहे. दुसरा मार्ग म्हणजे, येणारे विचार हे आपले नव्हेत असें मानण्याचा अभ्यास करावयाचा. साक्षी पुरुषाप्रमाणें आपण मागें अलिप्तपणें उभें रहावयाचें आणि येणाऱ्या विचारांना संमति द्यावयाची नाहीं–– बाहेरून प्रकृतीच्या क्षेत्रांतून विचार येत आहेत, असें या पद्धतींत मानावयाचें असतें. आपणांस त्यासंबंधीं असा अनुभव आला पाहिजे कीं हे विचार म्हणजे कोणी वाटसरू प्रवासी आहेत आणि मनःप्रांत ओलांडून ते जात आहेत. त्यांच्याशीं आपला कांहीं संबंधहि नाहीं किंवा त्यांच्याविषयीं आपणांस कोणत्याहि प्रकारची गोडीहि वाटत नाहीं. असा अभ्यास चालू राहिला म्हणजे या पद्धतींत साधारणतः कालांतरानें मनाचे दोन भाग होतात; एक भाग साक्षी, निरीक्षक होऊन पहात असतो. तो पूर्णपणें अ-त्रस्त आणि अ-चंचल असतो. दुसरा भाग म्हणजे प्रकृतीचा भाग. तो आपल्या निरीक्षणाचा विषय होतो. त्यामधून विचार जात येत असतात किंवा भटकत राहतात. पुढें हळुहळु मनाचा हा प्रकृति-भागहि स्थिर-शांत आणि निश्चल-नीरव करण्यास आरंभ करतां येतो. तिसरा मार्ग यापेक्षां जरा निराळ्या सक्रिय पद्धतीचा आहे. त्यामध्यें, विचार कोठून येतात हें पाहण्यासाठीं साधक आंतमध्यें दृष्टि वळवून पहात राहतो. त्याला असें आढळून येतें कीं विचार स्वतःमधून येत नाहींत, तर ते बाहेरून, जणु डोक्याच्या बाहेरून येत असतात. असे येतांना जर त्यांना पकडतां आलें तर ते आंत घुसण्याच्या पूर्वींच त्यांना दूर ढकलून द्यावयाचें. ही पद्धत सर्वांत कठीण आहे. म्हणून सर्वांना तिचा अवलंब करणें शक्य नसतें. परंतु जर एखाद्यास ही पद्धति साधली तर मनाचे ठिकाणीं निश्चल नीरवता प्रस्थापित करण्याचा तोच अगदीं जवळचा, अत्यंत प्रभावी मार्ग आहे.

––श्रीअरविंद

Sri Aurobindo : Bases of Yoga : Page 50

# साहित्य सत्कार

सुप्रसिद्ध रोमन तत्त्वज्ञानी सम्राट मार्कस् ऑरेलियसचें **आत्मचिंतन.** अनुवादक--श्री. र. वि. शिरढोणकर. उषा प्रकाशन--स्वाध्यायमंडळ, पारडी. मूल्य ७५ न. पै. पानें ६६.

परमहंसदेव श्रीरामकृष्ण रात्रीं गच्चीवर जाऊन मोठमोठ्यानें हांका मारीत असत, "या रे या, या सारेजण, मी तुमची केव्हांपासून वाट बघतो आहे"! ऐकणाऱ्यांचें हृदय हलविणाऱ्या या करूण आर्त हांकेला ओ देऊन आला त्यांचा अंतरंग-चिरपरिचित शिष्यवृंद !

सत्याच्या शोधासाठीं व्याकूळ झालेल्यांचें अंतरंगसुद्धां अशाच रीतीनें सहाय्यभूत उपकरणांना आर्ततेनें शोधीत असतें. कोणत्याहि दिशेला, कोणत्याहि स्वरूपांत, कोणत्याहि परिस्थितींत एकादा प्रकाशकिरण दिसला कीं तो धांवून जातो तिकडे.

तद्वत्, आत्मोपलब्धिसाठीं साहित्याच्या मरुभूमींतून प्रवास करणाऱ्या पथिकाला प्रस्तुतचें मार्कस् ऑरेलियसचें आत्मचिंतन म्हणजे आल्हाददायक हिरवळच वाटेल यांत शंका नाहीं. मार्क्स ऑरेलियस ! सतरा शतकांपूर्वीं होऊन गेलेल्या रोमच्या या तत्त्वज्ञानी सम्राटानें आपल्या पराक्रमी अस्मितेनें रोमचें सिंहासनच केवळ भूषविलें असें नव्हे, तर राजा जनकाप्रमाणें सत्याचा महान् अन्वेषक म्हणून सुद्धां स्वतःचें व अनेक देशवासियांचें जीवन त्यानें उज्ज्वल केलें आहे, उन्नत केलें आहे.

संपूर्ण पुस्तक वाचतांना आपल्या अतीव परिचयाच्या कोण्या भारतीय संताचींच वचनें आपण ऐकत आहोंत असें जें वाटतें तोच या पुस्तकाचा गौरव होय असें म्हणावेंसें वाटतें. किंबहुना, त्याच्या मृत्यूविषयक कल्पना, त्याचीं सदाचरणाचीं मूल्यें, तसेंच सामाजिक, मानसिक व आत्मिक स्तरांवर माणसाला विशालता प्रदान करणारीं त्याचीं मौक्तिकें म्हणजे भारतीय वेदांताचीच प्रकाशमान प्रतिरूपें आहेत असें जर कोणी म्हटलें तर त्यांत वावगें तें काय ?

'मृत्यूला भितो म्हणजे भय कशाचें वाटतें ? शरीरांतील चैतन्य नाहीसें होतें म्हणून भीति वाटते कां ? किंवा नवजीवन व नवभावनांमुळें घाबरतो ? चैतन्य नाहीसें झाल्यावर मग दुःख कशाचें ? नवीन अनुभवामुळें नुकसान कसें होऊं शकतें ? नाविन्याला मृत्यू कसें म्हणावयाचें' ? हीं व अशाच प्रकारचीं अनेक वाक्यें खात्रीनें मननीय आहेत.

हा अमोल ठेवा श्री. र. वि. शिरढोणकरांनीं मराठी वाचकांपुढें ठेवला याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच.

शेवटच्या पृष्ठावरील वेदाचार्य पं. श्री. दा. सातवळेकर यांचे सदरहू पुस्तकावरील विचार देखील सूचक व मार्गदर्शक आहेत.

--गजराज

*

**व्यवसायाचा सूत्रधार आणि व्यवसायाचीं जीवनसत्त्वें :—**

अनुवादक—श्री. न. गं. वीरकर. स्वाध्याय-मंडळ. पारडी. पृ. ९८. किं. १॥ रु.

आर्थिक व औद्योगिक क्रांतिमय-परिवर्तनांतून आपल्या देशाचें पाऊल झपाट्यानें पुढें पडत असतांना, निरनिराळ्या व्यवसायांत पडणाऱ्या होतकरू व साहसी तरुणांना, पुस्तक-रूपानें प्रसिद्ध झालेली 'व्यवसायाचा सूत्रधार आणि व्यवसायाचीं जीवनसत्त्वें' ही लेखमाला अतिशय मार्गदर्शक ठरल्यावाचून रहाणार नाहीं. व्यवसायांत लागणारे गुण, निर्माण होणाऱ्या अडचणी व येणारे खांचखळगे समर्पक उदाहरणें देऊन मांडण्यांत आल्यामुळें पुस्तकांत उप-युक्ततेबरोबर एक प्रकारची गोडी व रोचकता निर्माण झाली आहे. आपल्या देशांतील व्यवसाय व लोकांची मनोवृत्ति या पार्श्वभूमीवर एक स्वतंत्र पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न लेख-कानें जरूर करावा. आपल्याकडे दुर्मिळ असलेल्या वाङमय–प्रकारांत लेखकानें हें पुस्तक लिहून जी भर घातली आहे तीबद्दल लेखकाचें अभिनंदन केल्याशिवाय रहावत नाहीं.

व्यवसायांतील विविध छटांनीं युक्त व नाविन्यानें नटलेलें हें पुस्तक वाचकांना निश्चितच विलोभनीय व प्रेरक वाटेल.

—वसंत

★

**विनायकवैजयन्ती**—(संस्कृत)—ले० श्री. भा. वर्णेकर. मूल्य २ रु. पृष्ठें ५१.

एका आधुनिक कवीनें व संस्कृत प्रेमीनें लिहिलेली ही शंभर मुक्तिकांची कविता वाचतांना मला अत्यंत आनंद व कौतुक वाटलें.

आपलें दैवी नियतकार्य विसरल्यामुळें ज्यावेळीं भारतमातेच्या मुखावर ग्लानी आली होती आणि ती परदास्यांत खितपत पडली होती त्यावेळीं त्यांतून तिला मुक्त करून स्वातंत्र्याचें स्वर्गीय मंदिर उभारण्याच्या कामांत आघाडीचे वीर म्हणून ज्यांनीं कामें केली त्यांतील एक देशभक्त श्री. वि. दा. सावरकर होत. त्यांच्या हृदयांत शिवाजीप्रमाणें देशभक्तीची जिवंत ज्वाला सतत धगधगत होती. आपलें शक्तिसर्वस्व त्यांनीं त्याच एका महान् कार्यासाठीं वेंचलें आणि अनेक कष्टभोगांना हंसत तोंड दिलें.

या स्वातंत्र्यवीराला अर्पण केलेली ही हृदयस्पर्शी मुक्तकांची सुमनांजलि ही लाखों भारत-वासियांच्या मनामध्यें त्यांच्याविषयीं वसत असलेल्या आदराचेंच जणुं प्रतीक आहे. मुक्त-कांची शैली सोपी व सहजसुंदर असून त्यांतील प्रत्येक शब्द अर्थपूर्ण व तालबद्ध आहे. लेख-काचें संस्कृत भाषेवरील प्रभुत्व वेळोवेळीं स्पष्ट दिसून येत आहे. खरोखर आधुनिक संस्कृत वाङमयामध्यें ही एक योग्य अशी भर पडली आहे. मराठी अनुवाद दिल्यानें विद्यार्थ्यांना आकलन होण्यास मदत होणार आहे.

जागृत झालेल्या नवभारताची नूतन विचारप्रणाली, नवीन आकांक्षा, नवीन आंस आणि नूतन विकास मूर्तिमान् करणाऱ्या संस्कृत वाङमयाची निर्मिति होणें आजच्या काळांत अत्यंत आवश्यक आहे. अशा तऱ्हेची गद्य अथवा पद्य संस्कृत रचना लेखकानें करावी, विशेषतः आपल्याकडील पौराणिक कथा ह्या दृष्टिकोनांतून व सुलभ आणि मधुर भाषेमध्यें लिहिल्या जाव्या अशी इच्छा शेवटीं व्यक्त करावीशी वाटते.

—पूजालाल